**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०७/०१/२०१६

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र- ०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**मंगळवार दिनांक- १२/०१/२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४१ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ४२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (विविध विभागांचे ) |
| ४३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा नि:शुल्क करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता जंतूनाशक द्रव्ये, पावडर इ. पुरवठा खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट म्हणून मा.ॲड.मंगला राजेश कोठारी यांना अटक झाले बाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबतचा ऑफिस रिपोट |
| ४६ | अहमदनगर महानगरपालिका अंतर्गत कचरा वाहतूक करणे करिता कॅाम्पॅक्टर खरेदी कामी तसेच या अनुषंगाने लोखंडी कंटैनर (५० नग) खरेदी करणे कामी योणा-या खर्चा बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४७ | अर्जदार सय्यद फैय्याज अय्युब रा.घर नं.१३/९,गजानन सोसायटी ,जुना मुकुंदनगर,अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॅार्ड क्रमांक ८७, बील क्रमांक १८६, नळ कनेक्शनची बंद केले असतांना आकारण्यात आलेल्या पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ४८ | अर्जदार घेवरचंद चांदमल बोरा तर्फे श्री राजेंद्र चंपालाल मुथ्था दाणे डबरा अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७६५, नळ कनेक्शनची नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार नळ कनेक्शन नसल्याने सन २०१५ अखेर ची पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४९ | अर्जदार श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार,प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ४३०, नळ कनेक्शनची नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार नळ कनेक्शन नसल्याने सन २०१४- २०१५ अखेर ची पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५० | अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५१ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदी डॉ.अमोल सुरेश जाधव यांची तांत्रिक खंड दंवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ५३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ. श्री. प्रविण व्ही. कराळे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५४ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, परिचारिका यापदी अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट . |

सही /-
प्र.नगरसचिव ,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- ४१ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ४२ ते ५४ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४१ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- आपले सहकारी मा.नगरसेवक श्री.विजयजी भांगरे यांचे दु:खद निधन झाले त्यांना आपण दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहू.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती सभा क्रमांक- ०२ दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून दाखवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.दिप चव्हाण :- डिम परमीशनची माहिती मी मागीतली होती.ती मला अद्याप मिळाली नाही.आपण चर्चा करतो पण माहिती मिळत नाही.तीन महिने झाले.

मा.उपयुक्त (सा):- नगरसचिव खुलासा करा.

मा.श्री.दिप चव्हाण :- १० व्या महिन्यात चर्चा झाली त्यावेळी प्रभारी नगरसचिव श्री.साबळे होते.परंतु त्यानंतर नेहमीचे प्रभारी नगरसचिव यांनी चार्ज घेतला. त्यांनी इतिवृत्ताबाबत फॉलअप घ्यावयाला पाहिजे होता.

मा.उपायुक्त (सा):- आपल्याला सात दिवसात माहिती देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

प्र.नगरसचिव श्री वैदय :- सदस्यांनी जी भावना व्यक्त केली , त्यानुसार मा.सदस्यांना समक्ष भेटून मी समाधान करील जे विषय प्रशासनाकडे पाठविले त्या पैकी काही विषय मंजूर करण्यात आले.आजतागायत चा आढावा घेवून माहीती मी देतो.आपणास समक्ष भेटून मी माहिती देईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- आस्थापना विभागामार्फत नगरसचिव यांना नोटिस बजावण्यात आली होती. दंडात्मक कार्यवाही बाबत मी १४/१०/२०१५ च्या सभेतही माहीती विचारली होती. नगरसचिवांना नोटीस बजावण्यात आली, ती कोणी बजावली.मागच्या वेळी ती नोटीस मी मागीतली होती ती सुध्दा आस्थापना विभागाने सादर केली नाही किंवा मला माहितीकरीता दाखवली नाही. नगरसचिव हे संविधानिक पद आहे. मागील सभेचे इतिवृत्त कायम करतांना अधिका-यांनी अभ्यास करायला पाहिजे.वेळोवेळी हे सांगायला पाहिजे का.

मा.सहाय्यक आयुक्त :- आस्थापना विभागा मार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.

मा.उपायुकत (सा):- सन्माननीय सदस्यांनी जी खंत व्यक्त केली,नगरसचिव विभागाने प्रशासनाकडे पाठविलेल्या विषयांची माहिती देण्याची कार्यवाही करायला पाहिजे, नगरसचिव यांनी मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेले व नामंजूर केलेले विषय, पुन्हा स्थायी समिती मध्ये सादर केलेले प्राप्त विषयांचा तक्ता सदस्यांना सात दिवसांत सादर करावा. तसेच सर्व खाते प्रमुखांची त्यांनी सदस्यांनी मागितलेली माहिती दिली नाही अशी तक्रार पुन्हा येणार नाही याची दक्षता प्रशासन घेईल.

मा.श्री.संपत बारस्कर :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- कार्यवृत्त कायम करा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ बुधवारदिनांक१४/१०/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा. श्री. संपत बारस्कर सही/-

अनुमादेक :- मा. श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४२ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (विविध विभागांचे )

**प्रस्तावाचा मजकूर :-** जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक/७२४/१५ दिनांक २२/१२/२०१५

संदर्भ :- विविध विभांगाचे प्रस्ताव

उपरोक्त विषयाचे संदर्भाकित प्रस्तावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ / घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून व संबंधीत विभाग प्रमुखांची बैठक घेउन पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत मा.उपायुक्त (सा.प्र.) यांचेशी चर्चा केली. चर्चेअंती सन २०१५-२०१६ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०३ व अनुसूची "ड" मधील प्रकरण ७ मधील २ (२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातून दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल, अशी तरतूद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत. " अशी तरतूद असल्याने प्रकरण ७ मधील २ (२) मधील (अ) (ब) व (क) नुसार सन २०१५-२०१६ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०१५-२०१६ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणे योग्य राहील. कृपया आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, रजेवर

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालाप्रमाणे दिनांक २२/१२/२०१५ रोजी झालेल्या चर्चेप्रमाणे सर्व विभागाचे एकत्रित प्रस्तावासह माहिती अद्ययावत करून फेरसादर करावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सोबत- ११ प्रस्ताव व तक्ता

०००००

**महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा**

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर**

**सन २०१५-२०१६ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र**

| या शिर्षातून | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान,गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (२०१५-१६ | दि.२६ नोव्हेंबर २०१५ अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावित कमी करावयाची रक्कम ) | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | थकीत देयके (इतिवृत्त ठराव) | ३५०००००० | २२९४९८० | १७३००००० | १७७००००० | जकात कर परतावा न्यायालयीन आदेशान्वये मुदतीत करणे आवश्यक होते |
| | | शहर, उपनगर व हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम ( इति. ठराव ) | १०८००००० | २३४७१८५ | २१००००० | ८७००००० | बी.आर.जी.एफ. मध्ये निधी वर्ग करणेकामी |
| | | उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिक्राणी रस्ते विकसीत करणे (इति.ठराव ) | १०००००० | ० | ६०९००० | ३९१००० | बी.आर.जी.एफ. मध्ये निधी वर्ग करणेकामी |
| | | मा.महापौर शहर विकास निधी (इतिवृत्त ठराव ) | ८००००००० | २४२२३६५ | १६००००० | ७८४००००० | बी.आर.जी.एफ. मध्ये निधी वर्ग करणेकामी |
| २ | मार्केट विभाग | शिक्षण कर (मार्केट) | ११००००० | ० | ८००००० | ३००००० | सेवा करची तरतूद कमी असल्याने वर्ग |
| | | एकुण रक्कम (तरतुद ) | | | **२२४०९०००** | | |

०००

| हया शिर्षात | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रधान,गौण व तपशील वार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (२०१५-१६ | दि.२६ नोव्हेंबर २०१५ अखेरचा खर्च | प्रस्तावीत वाढीचा रक्कम | अभिप्राय (११+१३) सुधारित तरतूद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | बांधकाम विभाग | प्राथमिक सोयी सुविधा अनुदान | १०००००० | ३२४७२५८४ | ४४०००००० | ५४०००००० | रू. ५.४० कोटीचे अनुदान मंजुर झाल्याने |
| | | जकात परतावा | २००००० | १७०००००० | १७३००००० | १७५००००० | जकात कर परतावा न्यायालयीन आदेशान्वये मुदतीत करणे आवश्यक होते. |
| | | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले-आउट) | १५०००००० | २०००००० | १९४३७००० | ३४४३७००० | १] ई-निविदा प्रक्रिया पार पाडणेसाठी (रू. ५० लाख), २] ई-निविदा प्रक्रिया पार पाडणेसाठी (रू.१४४३६६८०) |
| | | विकास भार | ६०००००० | ८३२५०९४ | ४०६५००० | १००६५००० | ई - निविदा प्रक्रिया पार पाडणेसाठी |
| | | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (स्पर्धा परिक्षा इमारत) | १००००० | २३५७३२९ | ३४४६००० | ३५४६००० | जिल्हा नियोजन सामितीने अनुदान मंजुर केल्याने |
| | | मागासक्षेत्र विकास निधी बीआरजीएफ | २७०००००० | १५४९०३४६ | ४३०९००० | ३१३०९००० | |
| | इले. विभाग | उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी अनुदान | १००० | १९९५२०९ | १९९९००० | २०००००० | अनुदान सन २०१२ ला प्राप्त होते मात्र खर्च बाजुस तरतुद कमी होती. |
| | मार्केट विभाग | सेवा कर (मार्केट) | ५००० | ० | ८००००० | ८०५००० | सेवा कराची तरतूद कमी असल्याने |
| | जनगणना विभाग | सन २०११ जनगणना खर्च | १००००० | ७६०२०४ | ९००००० | १०००००० | अनुदान प्राप्त झाल्याने |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नगरसचिव विभाग | मा.सदस्य मानधन | ७३६०००० | ७३४६२५० | ३२८५००० | १०६४५००० | मागील सन २०१४-१५ चे थकीत मा. सदस्य मानधन सन २०१५-१६ मध्ये दिल्याने तरतुदीत वाढ |
| | | एकुण रक्कम (तरतुद ) | | | **९९५४१०००** | | |

**टिप-** सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक तयार करताना शासनाकडून प्राप्त होणारे अनुदानाबाबत विभागांनी तरतूद कमी केली व प्रत्यक्षात अनुदान जास्त प्राप्त झाले. तसेच काही अनुदान अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर प्राप्त झाल्याने त्याची तरतूद जमा व खर्च बाजू दोन्ही बाजुस करावी लागणार आहे. त्यामुळे शासन अनुदानाची तरतूद खर्च बाजुस पुनर्विनियोजनाप्रमाणे करणेबाबत सादर.

०००

जा.क्र. ७४७ दिनांक ०२/०१/२०१६ अर्थ विभाग

विषय :- सन २०१५-२०१६ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाचा विषय मा. स्थायी समिती सभेमध्ये घेणेबाबत.

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०१५-१६ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत विविध विभांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. सदर प्रस्ताव एकत्रित करून मा. स्थायी समितीस सादर करणेकामी आपणाकडे पाठविण्यात आले आहे.

तरी सन २०१५-२०१६ चा पुनर्विनियोजन अंदाजत्रकाबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे घेणेत यावा ही विनंती.

येणेप्रमाणे मुख्यलेखाधिकरी यांचा रिपोर्ट असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- मागच्या वेळी लेखा विभागाचा एक अहवाल सादर झाला होता.त्यामध्ये ब-याच चुका होत्या त्याबध्दल सभासदांनी स्पष्टीकरण विचारले होते. तो काय विषय झाला होता.

मा.नगरसचिव श्री.वैद्य :- मागच्यावेळी लेखा विभागातून वार्षिक लेखे तपासणी अहवाल सादर केले होते.त्यामध्ये ओपनिंग बॅलन्स मायनस दिसत होता.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :- त्यावेळेस जे लेखे सादर केले ते सिंगल एन्ट्री ने लेखे सादर केले होते.गुंतवणूकीच्या रक्कमा त्यात घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे तसे आकडे दिसत होते.

मा.श्री.दिप चव्हाण :- सर्व बजेट डबल एन्ट्रीमध्ये मांडणे बाबत मा. शासन निर्णया व्दारे निर्देश दिले आहेत.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री विसपुते :- एप्रिल २०१२ मध्ये डबल एन्ट्री लागू करण्यात आली.सन २०१ ३-२०१४ या वर्षाचे लेखे दुरूस्त करून ठेवण्यात आला आहे.वार्षिक जमा बाजूच्या रकमा संपुर्ण एकेरी पध्दतीने व खर्च बाजूच्या डबलएन्ट्रीने दाखविल्याने बॅलन्स मायनस दिसत होता.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्याचे ऑडिट झाले नव्हते का .त्या वेळी लक्षात आले नाही का.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री. विसपुते :- अनारसे साहेबांनी लक्षात आणून दिले. माझ्या लक्षात आले नव्हते.

मा.श्री.दिप चव्हाण :- एखादे परीपत्रक काढून जनतेला आपल्या चुका सांगा. दूरूस्तीचे पत्र का निघत नाही आजपर्यंत एकही पत्र काढले नाही. तुमच्याकडून चुकले त्याची दुरूस्ती केली याचे परिपत्रक का काढले नाही.पेपरच्या माध्यमातुन खुलासा द्यावा.सभापती साहेब ही गंभीर बाब आहे.आम्हाला खोलात जायला वेळ लागत नाही.व तुम्ही वागणूकीत जरा बदल करा.

मा.सौ.सुनिता कांबळे :- केडगांव पाणीपुरवठा योजनेत तरतुद वाढविण्याचा विषय दिला आहे.त्याचा समावेष करण्यात यावा.

मा.मुख्यलेखाधिकारी :- पुढच्या सभेमध्ये वार्षीक लेख्यांच्या बाबत अहवाल देतो.

मा.श्री.सचिन जाधव :- १५ दिवसांत अहवाल देणे,जमा व खर्चाची माहिती देणे बंधनकारक आहे.तुम्ही माहिती देत नाहीत.

मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :- दर १५ दिवसांनी स्थायी समितीला लेखा विभागाकडून आर्थीक माहिती सादर करण्यात येईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रका बाबत हे समितीसमोर काय मांडले आहे ते मला कळाले नाही.

मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते:- निरनिराळया विभागांच्या लेखाशिर्षांच्या पुनर्विनियोजन ला मंजुरी दयावयाची आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सभेसाठी ३ दिवसांची शॅार्ट नोटिस दिली आहे.हा विषय शॉर्टनोटिस चा विषय नाही.७ दिवसांची नोटीस दयायला पाहिजे ३ दिवसांत मंजूरी घेता. त्याला अभ्यासाला वेळ दया.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री. विसपुते :- नगरसचिव विभागा कडे जानेवारीत प्रस्ताव पाठविला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- मग आता कोणता महिना व किती तारीख आहे. आजच्या सभेची सूचना ७ तारखेला निघाली आहे. नगरसचिवांकडे प्रस्ताव किती तारखेला पाठवला.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री. विसपुते :- २ जानेवारी १६ ला

मा.श्री.दिप चव्हाण :- पुनर्विर्नियोजना बाबत परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाले का .

मा.मुख्यलेखाधिकारी श्री. विसपुते :- प्राप्त झाले तेवढे ठेवले.काही तरतुदी अत्यावश्यक आहेत त्या मुळे आमच्या विभागाकडे जसे प्राप्त झाले तसे पाठविले.

मा.श्री.दिप चव्हाण :- तूमची अपूर्तता आहे.त्याला आम्ही मंजूरी कशी दयायची. मंजूरी घेतांना सर्व विषयांना एकाच वेळी मंजूरी घ्या. तुम्ही सर्वाना वेडयात काढता. तुमची डूयटी अपूर्णता ठेवायची नाही.आम्हाला कारणे सांगता, विभागाने प्रस्ताव दिले नाही ते आमचे काम नाही २०१५-१६ ची मंजूरी घेता व त्यातही पूर्ण प्रस्ताव नाही.एक रूपया कुठे बदल केला हे रिऑपरेशन मध्ये कोठून कमी केला व कोठे वाढ केली

ते दाखविण्यात येते. तुमचे इंटरनल काही सांगू नका. रिऑप्रोपरेशनला अशा पध्दतीने मंजूरी घेता येते का.ऑफिस रिपोर्ट मध्ये कोणत्या विभागाने प्रस्ताव सादर केले नाही याचा उल्लेख केला आहे का.नगरसचिव तुम्ही अपूरे विषय कसे घेतले.हि कामाची पध्दत आहे का.कमीत कमी खुर्चीवर बसल्यानंतर सर्व अधिका-यांनी जबाबदारीची जाणीव ठेवा.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री. विसपुते :- बांधकाम व पाणीपुरवठा विभाग हे दोन विभाग आहेत.

मा.श्री. दिप चव्हाण :- तुम्ही संबंधीत विभागांना नोटीस काढल्या का.नुसते लिहुन घेवू नका.अॅक्शन काय घेणार ते सांगा केडगांव संदर्भात सदस्य विचारतो त्यावर काय झाले.

मा.उपायुक्त (सा) :- सन २०१५-१६ च्या बाबतीत सहा विभागाकडून प्रस्ताव सादर झालेले आहेत.वेळोवेळी संबंधीत विभागांना विहीत कार्यमर्यादेत प्रस्ताव सादर करणे बाबत आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.ज्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले नाही याचा अर्थ त्यांना रिअॅप्रोप्रेशन ची आवश्यकता नाही आणि जर मुदतीत विभागाने प्रस्ताव सादर केले नसतील तर संबंधीतावर प्रशासकीय शिस्तभंगाची कार्यवाही करू.

मा.श्री.दिप चव्हाण :- ज्या हेडवरची तरतुद कमी केली ती हया हया पानावर होती ती कमी केली असे पान नं.दर्शवून उल्लेख करणे आवश्यक होते.कर्तव्य पार पाडण्यामध्ये अधिकारी कमी पडतात हे यावरून सिध्द होते.बजेट चे पुस्तकाची कॉपी आम्हाला दिली नाही.तरतुद का वाढवीली हे आम्हाला पेजवाईज सांगायला पाहीजे.यामध्ये बाकीचे विषय कशाला घेता. हा विषय अपुर्ण आहे. त्यामुळे सदरचा विषय तहकुब करा व सर्व रिअॅप्रोप्रीएशनचे विषय एकत्रीत सादर करा.

मा.सभापती साहेब :- हा विषय पुढच्या मिटींग मध्ये घ्या बी.आर.जी.एफ. च्या कामांना दि.३१ डिसेंबर पर्यत वर्कऑर्डर दयायला पाहिजे होती.ती अदयाप दिली नाही. ते पैसे परत जातील का.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- सन २०१५ -१६ मुळ अर्थसंकल्पामध्ये२ कोटी ७४ लाक्ष तरतुद करण्यात आली होती.सन २०१५-१६ चे बजेट मंजूर झाल्यानंतर २ कोटी ७० लाक्ष रूपये रक्कम जमा झाली.२ कोटी ७० लक्ष रक्कमेची तरतुद करण्यात आलेली असल्याने तरतुद वाढविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा.सभापती साहेब :- कोठारींच्या कामाला वर्क ऑर्डर दिली नाही.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- ३१ मार्च २०१६ पर्यत रक्कम खर्च करावयाची आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- अदयाप का नाही झाले.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- आमच्या कडे जो टेंडर क्लार्क आहे त्याला जनगणना व बी.एल.ओ.चे काम असल्याने टेंडर सादर करता आले नाही.आजच मा.उपायुक्तांकडे स्वाक्षरी साठी सादर केले आहे.

मा.दिप चव्हाण :- पैसे असून कामे का होत नाही.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- तीन वेळा टेंडर री कॉल केले त्या नंतर बीलो चे टेंडर आले.

मा.श्री.दिप चव्हाण :- कीती तारखेला टेंडर आले त्याची तारीख सांगा

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव रोड येथील दोन कामाकरीता विलंब का झाला याचा खुलासा करा.

प्र.अभियंता श्री.निंबाळकर :-सध्या जो बांधकाम विभागाकडे श्री.बत्तुल टेंडर क्लार्क कार्यरत आहे त्याचेकडे कामाचा भार जास्त झाल्याने त्याला काम उरकत नाही.कर्मचारी मागणीबाबत आम्ही रिपोर्ट दिला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- टेंडर क्लार्क कडे काय काम आहे.झोन वाईज टेंडर क्लार्क का तयार केले नाहीत.४० कोटी च्या वेळी अशीच घाई झाली,बी.आर. जी.एफ. च्या वेळीसुध्दा अशीच घाई झाली.

मा.सभापती साहेब :- या व्यतीरीक्त त्याच्याकडे कोणते काम आहे.जनगणनेचे काम त्याला का देता. त्याला जर इतर कामे असतील तर दुसरा क्लार्क तेथे नेमा.

मा.श्री.दिप चव्हाण :- जनगणनेची ऑर्डर केव्हा आली.

प्र.अभियंता श्री.निंबाळकर :- १५ दिवसांपूर्वी आली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- हे काम दिड वर्षा पुर्वी चे आहे पंधरादिवसांपूर्वी जनगणनेची ऑर्डर आली आहे.व त्यामुळे टेंडर क्लार्क ने काम केले नाही अशी माहीती देता का.

मा.सभापती साहेब :- त्याच्या कडून वेळेमध्ये काम होत नसेल तर कारवाई करा.यांना वाटते ठेकेदारांनी यांच्या मागे फिरले पाहीजे. यांना काही तरी दिले पाहीजे. त्याला होत नसेलतर दुसरा माणूस दया

मा.श्री.दिप चव्हाण :- दोन दोन झोन करीता १ टेंडरक्लार्क ची नेमणूक करा.

मा.उपायुक्त (सा) :- आज संध्याकाळपर्यत वर्कऑर्डर देण्याची कार्यवाही करा.

मा.श्री.सचिन जाधव :- संबंधीत कर्मचारी त्या ठिकाणी सात ते आठ वर्षापासून कार्यरत आहे.दुसरा कर्मचारी त्या ठिकाणी नेमावा.कर्मचारी अनेक वर्षे एकाच जागेवर काम करतात,त्यांना बदला. त्यांचेशिवाय काम होणार नाही असे नाही.

मा.सभापती साहेब :- दोन दिवसांत कर्मचारी दया. प्रत्येकाकडे दोन- दोन झोन दया

मा.श्री.संपत बारस्कर :- हा विषय अगदी अपुर्ण आहे. त्यामुळे सदरचा विषय तहकुब करा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- अपुर्ण विषय असल्याने तहकुब ठेवावा.

मा. सभापती साहेब :- हा विषय  तहकुब ठेवण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या  सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात विविध विभागांचे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकात  सर्व विभागांचे प्रस्ताव नसल्याने सदरचा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.सदर विषय पुन्हा लेखा विभागाकडे पाठविण्यात यावा. सर्व विभागांचे पुर्नविनियोजनाचे प्रस्ताव एकत्रीत व परिपुर्ण करून प्रस्ताव सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर            सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा      सही/-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४३ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा निःशुल्क करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका फिरता दवाखाना

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेच्या शहरातील दुर्गम भाग व आर्थिक दृष्टयामागासलेला वर्ग यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फिरता दवाखान्याचा (Mobile Van) हा मुळ उद्देश आहे. नगर शहरामध्ये अंदाजे २९ स्लम एरिया आहेत. सदर भागामध्ये नागरिकांना मनपामार्फत औषधोपचार करण्यासाठी फिरता दवाखाना उपलब्ध आहे. सदरच्या फिरता दवाखान्याचे वाहनाद्वारे दारिद्ररेषेखालील वस्तीत जाउन आरोग्य बाबत जनजागृती , आरोग्य सेवा व शिबीरे तसेच साथीच्या रोगामध्ये आपात्कालीन आरोग्य सेवा वेळेमध्ये व उत्कृष्टरित्या देण्यात येतात. तसेच शहरामध्ये उद्‌भणा-या साथीच्या रोगांवर व्यवस्थित नियंत्रण ठेवण्याकरिता सदरचा फिरता दवाखान्याचा उपयोग होतो.

सदरच्या दवाखान्यामध्ये आरोग्य सेवा पुरविणेकामी घेण्यात येणा-या सेवा शुल्कांबाबत चे दर मा. महासभा क्रमांक ४ ठराव क्रमांक ७५ दिनांक २९/३/२०११ अन्वये दिनांक ७/७/२०११ पासून खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात.

महानगरपालिकेच्या दवाखाने व आरोग्य केंद्रामध्ये व फिरता दवाखान्यामध्ये वैद्यकीय सेवेबाबत घेण्यात येणारे दर

| अ.क्र. | वैद्यकीय सेवा तपशील | दिनांक ७/७/२०११ पासून वाढविलेले दर |
|---|---|---|
| १ | नवीन केसपेपर ७ दिवसांकरिता | ५/- |
| २ | औषधे १ दिवसांकरिता | १०/- |
| ३ | ड्रेसिंगकरिता | १०/- |

फिरता दवाखान्यामध्ये मागील चार वर्षाची रूग्णसंख्या व भरण्याची माहिती खालील प्रमाणे--

| अ. क्र. | कालावधी | फिरता दवाखांन्यामार्फत लाभ घेणा-या रूग्णांची संख्या | जेष्ठ नागरिक व आरोग्य शिबीरामध्ये मोफत लाभ घेतलेल्या रूग्णांची संख्या | शुल्क भरून लाभ घेतलेल्या रूग्णांची संख्या | एकूण भरणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०११-२०१२ | ८५३ | ७६८ | ८५ | १२७४/- |
| २ | २०१२-२०१३ | ९१० | ८९१ | १९ | ४७५/- |
| ३ | २०१३-२०१४ | ९५० | ९२८ | २२ | ५१५/- |
| ४ | २०१४-२०१५ | २९८८ | २९७६ | १२ | ३७०/- |

वरील प्रमाणे रूग्णांच्या संख्येचा मागील चार वर्षाचा अहवाल पाहता दिनांक ०७/०७/२०११ पासून शुल्क वाढ झाल्यानंतर फिरत्या दवाखान्यामध्ये शुल्क भरून आरोग्य सेवा घेणा-या रूग्ण संख्येवर परिणाम झालेला आहे. तसेच फिरता दवाखान्यामार्फत जेष्ठ नागरिक, आरोग्य शिबीरे व साथरोगाचे रूग्ण मोफत उपचार घेणा-या रूग्णांची संख्या मोठया प्रमाणात दिसून येते.

सध्या फिरता दवाखान्यामार्फत देण्यात येणा-या आरोग्य सेवेकरिता औषधांसाठी शुल्क रूपये १०/- प्रति दिवसांकरिता करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे सध्या कमीत कमी तीन दिवसांच्या उपचारांकरिता केसपेपर फी रू.५/- व औषधोपचाराकरिता रू.३०/- याप्रमाणे रू.३५/- इतका खर्च येत आहे. फिरता दवाखान्याचे वाहन हे

प्रामुख्याने आर्थिक दृष्टया दुर्बल व शहरातील दुर्गम भागामध्ये सेवा देत असते. त्यामुळे या भागामध्ये लाभ घेणारे लाभार्थी रूग्ण हे आर्थिक दृष्टया मागासलेले असल्याने शुल्क भरून आरोग्य सेवेचा लाभ घेण्यास अल्पसा प्रतिसाद मिळत आहे.

तरी अहमदनगर शहरातील आर्थिक दृष्टया दुर्बल व दुर्गम भागातील लाभार्थी रूग्ण आरोग्य सेवे पासून वंचीत राहू नये म्हणून फिरता दवाखान्याची सेवा विनाशुल्क करणे उचित वाटते. जेणेकरून मनपाच्या फिरता दवाखान्याच्या वैद्यकीय सेवांचा लाभ जास्तीत जास्त गरजू रूग्ण घेतील.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव व पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी , फिरता दवाखाना यांचा रिपोर्ट असे.

यावर आरोग्याधिकारी यांचा अभिप्राय की, फिरता दवाखानाची वैद्यकीय सेवा घेणारा वर्ग गोरगरीब व आर्थीकदृष्टया दुर्बल आणि झोपडपट्टी भागातील असल्याने आणि ब-याच वेळेस साथ रोग नियंत्रण निमित्ताने वैद्यकीय सेवा देताना रूग्णास शुल्क भरणेस सांगणे शक्य होत नाही व रूग्ण ,नातेवाईक शुल्क अदा करणेस तयार होत नाहीत. या सेवेचा उददेश या सर्व सेवा संबंधीतांस वेळेत मिळावी हा असल्याने व याकामीचा एकूण भरणा लक्षात घेता ही रक्कम खूपच नाममात्र आहे. सबब ही सेवा तपासणी व औषधोपचार मोफत करणे योग्य होईल. सबब प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सदरची बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्यामुळे निर्णयास्तव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास हरकत नाही. मा.महासभेसमोर प्रस्ताव सादर करणे आवश्यक ठरेल.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, कोणतीही मोफत देवू नये वैयक्तीक मत आहे. धोरणत्मक बाब असलेने मे. अर्थसंकल्पासोबत उचित कार्यवाहीस्तव प्रथम मे. स्थायी समिती सभा नंतर मे. महासभेसमोर प्रस्ताव सादर करणे उचित होईल. आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा नि:शुल्क करणेबाबत ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट कोणी दिला ?का गरज वाटली?

प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.सतिश राजुरकर :- फिरत्या दवाखान्याची महानगरपालिकेतर्फे सुविधा देण्यात येते. झोपडपट्टीमध्ये ओ.पी.डी सेवा आपण देतो. या सेवेसाठी महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणारी फि व रूग्णसंख्या यांची पडताळणी केली असता भरणा अत्यल्प असल्याचे निदर्शास येते.मागील तीन वर्षे ची भरणा जमा झालेली रक्कम माहीती दिली.व या करीता एक भरणा क्लार्क नेमणूक करण्यात आली आहे.साथीच्या रोगाच्या कालावधीमध्ये मोफत सेवा पुरवावी लागते. सेवा जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचावी या करिता निशु:ल्क सेवा देणे बाबत प्रस्तावित केले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय वर्षाभरात मध्ये घेता येतो का. दर कराला मंजूरी आम्ही सन २०१५-१६ च्या बजेट मध्ये दिली आहे.हा विषय बजेट मधील आहे. बजेट चा पुर्नविनियोजनाचा विषय सध्या तहकूब केला आहे मग आता सेपरेट विषय कसा घेता येईल.नगरसचिव सांगा,याकरीता आज बजेट हेड आहे का.

प्र.नगरसचिव श्री.वैद्य :- या बाबत जे बजेट हेड आहे किंवा नाही याबाबत अर्थ विभाग माहिती देईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय घेताच येत नाही. आत्ता तहकूब करा,आणि बजेट मध्ये समाविष्ट करून पाठवा.नगरसचिव तुम्ही हा विषय सभेसमोर कसा घेतला.

प्र.नगरसचिव श्री.वैद्य :- प्रशासनाकडून एखादा विषय सभेसमोर विचारार्थ ठेवण्याकरीता मान्यता देउन सादर केला जातो,तेंव्हा तो सभेसमोर घ्यावा लागतो.

मा.श्री.संपत बारस्कर :- हा विषय अर्थसंकल्पाशी निगडीत असल्याने सदरचा विषय तहकुब करा व विभागाकडे परत पाठवा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- हा विषय अर्थसंकल्पाशी निगडीत असल्याने तहकुब ठेवावा व विभागाकडे पाठवावा.

मा.सभापती साहेब :- हा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.विभागाने नियमानुसार सादर करावा.

**<u>ठराव</u>:-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा नि:शुल्क करणेबाबत ऑफिस रिपोर्ट तहकुब ठेवण्यात येत आहे. सदर विषय संबंधीत विभागाकडे पाठविण्यात यावा. सदर विषय हा अर्थसंकल्पाशी निगडीत असल्याने विहित पध्दतीने सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता जंतूनाशक द्रव्ये, पावडर इ. पुरवठा खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

विनंती रिपोर्ट की, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस जंतुनाशक द्रव्ये , पावडर उदा.डी.डी.व्ही.पी.७६% इ.सी.,टेमिफॉस ५०% ई.सी., बायोलार्व्हीसाईड (बी.टी.आय.) लिक्विड, बायोलार्व्हीसाईड (बी.टी.आय.)पावडर,पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट २%,मलेरिया लार्व्हीसाईडल (एम.एल.ओ.) ऑईल, नॅपसॅक फवारणी पंप,फॉगींग मशिन,प्रिमिफॉस मिथाईल, नॅचरल पेस्टिसाईड/बायोकल्चर पावडर,नॅचरल पेस्टिसाईड/बायोकक्चर लिक्विड, कार्बो-फेनॉल पावडर-सफेद रंगाची,हायड्रो-क्लोरिक ॲसिड एन/३०,ब्लॅक फिनेल,सेंटेड फिनेल इ.पुरवण्यासाठी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई -३२ दि.६/८/ २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई २)डॅपमन्स पेस्ट कंन्ट्रोल अँण्ड अलाईड सर्व्हिसेस,डोंबीवली
३)बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड.,नवी दिल्ली

याप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे) लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -अ.क्र.९ ते ११ चे दर तीनही निविदाकार यांनी दिलेले नाहीत.

अ.क्र.४ चा दर बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड.,नवि दिल्ली यांनी,

अ.क्र.८ चा दर डॅपमन्स पेस्ट कंन्ट्रोल अँण्ड अलाईड सर्व्हिसेस,डोंबीवली यांनी,

अ.क्र.१३ ते १५ चे दर आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई यांनी एकटयानेच दिलेले आहेत त्यामुळे स्पर्धात्मकदृष्टया तुलना करता येत नाही.

अ.क्र.१ ते ३,५ ते ७ व १२ चे दर दोनच निविदाधारकांनी दिलेले असून त्यामध्ये तुलना करता - अ.नं - १ ते २ व ५ चे दर आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई यांचे,अ.नं.३,७ व १२ चे दर डॅपमन्स पेस्ट कंन्ट्रोल ॲण्ड अलाईड सर्व्हिसेस,डोंबीवली यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे आहेत.

परंतू उपरोक्त पैकी आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई यांचा अ.क्र.६ चा दर स्पर्धात्मकदृष्टया कमी आहे परंतू निविदेत नमुद स्पेसिफिकेशन प्रमाणे नाही.

बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड.,नवि दिल्ली यांनी अ.क्र.४ - बायोलार्व्हिसाईड (बी.टी.आय.) पावडर चे दर एकटयानेच नमुद केल्याच्या समर्थनार्थ दि.०७/०९/२०१५ रोजी ई-मेलद्वारे खुलासा केलेला आहे.(सोबत ई-मेल पत्र पान नं.१४३ ते १४४ वर जोडले आहे)याबाबत मा.नागरी हिवताप योजना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घेतला असता ना.हि.यो. हि.शासनाच्या निकषानुसार काम करत आहे.शासनामार्फत बायोलार्व्हीसाईड (बीटीआय)हे डास आळीनाशक लिक्वीड मध्ये पुरवठा होत असतो त्यामुळे बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड,नवि दिल्ली यांचे कडुन तुर्त सध्या पावडर स्वरुपात खूंरेदी करणेची आवश्यकता नाही.असा किंटक संहारक व मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अभिप्राय नमुद केलेला आहे.

तरी अ.क्र. १ ते ३,५,७ व १२ चे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे निविदा दर धारक आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई व डॅपमन्स पेस्ट कंन्ट्रोल अँण्ड अलाईड सर्व्हिसेस,डोंबीवली यांना जा.क्र.स्टोअर विभाग-१७२ दि.०३/१०/२०१५ अन्वये निविदा दर वाटाघाटीसाठी दि.०६/१०/२०१५ रोजी स ११=३० वा.

समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता दोनही निविदाकार यांचे प्रतिनिधी सदरवेळी समक्ष उपस्थित होते.सदर वेळी समक्ष झालेल्या चर्चेत निविदाकार यांनी बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे दर कमी केल्याचे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

**निविदाकार - आशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई**

| निवितील अ.क्र. | मालाचा तपशिल | निविदेमध्ये दिलेला दर | निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेला दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | Dichlorvos 76% EC ISI Mark (DDVP - 76% EC) | ५८५=०० / प्रती १ लिटर | ४७५=०० / प्रती १ लिटर India Pestisides कंपनीचे |
| २ | Temephos 50 % EC ISI Mark | १३७५=०० / प्रती १ लिटर | १०८५=०० / प्रती १ लिटर Nitapol Industries कंपनीचे |
| ५ | पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट २% ISI मार्क | १५७५=०० / प्रती १ लिटर | १३००=००/ प्रती १ लिटर Nitapol Industries कंपनीचे |

**<u>निविदाकाराचे नाव -</u> डॅपमन्स पेस्ट कंन्ट्रोल अँण्ड अलाईड सर्व्हिसेस,डोंबीवली**

| निवितील अ.क्र. | मालाचा तपशिल | निविदेमध्ये दिलेला दर | निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेला दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ३ | बायोलार्व्हीसाईड(बी.टी.आय.) लिक्विड | १६१५=०० / प्रती १ लिटर | १४८९=०० / प्रती १ लिटर |
| ७ | नॅपसॅक फवारणी पंप - १५ लिटर क्षमतेचे कंपनी - ॲस्पी / दिवाने | ३१६०=०० / प्रती १ नग | २५३९=०० / प्रती १ नग |
| १२ | CARBO - PHENOL POWDER White Colour Contain 5 % Carbolic Acid | ४०=०० / प्रती १ किलो | ३७=५० / प्रती १ किलो |

उपरोक्त प्रमाणे संबंधित निविदाकार यांनी निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.९ मध्ये नमुद)अ.क्र.१ ते ३,५,७ व १२ चे जंतुनाशक औषधे व साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीस व अ.क्र.४,६,८ ते ११ व १३ ते १५ ची जंतुनाशक व किटकनाशक औषधे व फॉगिंग मशिनची आवश्यकता लागल्यास जरुरीप्रमाणे कोटेशन दरपत्रके अथवा अल्प मुदतीची निविदा मागवुन खरेदी करणेस मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीच्या शिफारशी प्रमाणे संबंधित निविदाकार यांनी निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.९ मध्ये नमुद) अ.क्र.१ ते ३,५,७ व १२ चे जंतुनाशक औषधे व साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीस व अ.क्र.४,६,८ ते ११ व १३ ते १५ ची जंतुनाशक व किटकनाशक औषधे व फॉगिंग मशिनची आवश्यकता लागल्यास जरुरीप्रमाणे कोटेशन दरपत्रके अथवा अल्प मुदतीची निविदा मागवुन खरेदी करणेस मंजूरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.०८/१०/२०१५ चे प्रस्तावावर

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "स्टोअर लिपिक व स्टोअर विभाग प्रमुख यांचा प्रस्तावानुसार 'A' प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही "

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "यथाप्रस्तावित नूसार मान्यतेस्तव सादर".

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त सविस्तर अहवाला नुसार अंदाजपत्रकीय तरतुदीस अधिन राहुन निविदा मागविणेकामी मान्य तसेच तक्त्यामधील अ.क्र.१ ते ३,५,७ व १२ बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायीकडे सादर " असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीच्या शिफारशी प्रमाणे संबंधित निविदाकार यांनी निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.९ मध्ये नमुद) अ.क्र.१ ते ३,५,७ व १२ चे जंतुनाशक औषधे व साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीस व अ.क्र.४,६,८ ते ११ व १३ ते १५ ची जंतुनाशक व किटकनाशक औषधे व फॉगिंग मशिनची आवश्यकता लागल्यास जरुरीप्रमाणे कोटेशन दरपत्रके अथवा अल्प मुदतीची निविदा मागवुन खरेदी करणेस मंजूरी मिळावी हि विनंती. सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता जंतूनाशक द्रव्ये, पावडर इ. पुरवठा खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव विषयी आहे.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- हे सर्व झालेले आहे.बजेट करतांनाच मंजूरी दिली आहे बजेट तरतुदीस मंजूरी दिली आहे. दराचा तुलनात्मक तक्ता कोठे आहे.टेंडर दराचा तक्ता वाचा

मा.उपायुक्त (कर) :- वर्षभर टेंडर प्रोसेस चालू आहे.टेंडर झाल्यानंतरच्या दरास मंजूरीसाठी स्थायी समिती कडे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

मा.सभापती साहेब :- आजच माझ्याकडे श्री.भिमराज आनंदराव चितळे व श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांनी त्यांना व्यावसायासाठी अमरधाम कंम्पौंड लगत आणि कपिलेश्वर व्यायाम शाळे जवळ असलेली खुली जागा एक वर्ष कराराने देण्यात आलेल्या जागा जास्तीत जास्त वर्षे करार वाढवून देण्याबाबत अर्ज देवून आजच्या सभेत ठराव करावा अशी विनंती केली आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- जागा दिलेला एक वर्षाचा कालावधी फारच कमी आहे.एवढया वेळात धंदयाचा जम काय बसणार आणी बसलातर आपण जागा खाली करून घेणार हे बरोबर नाही.धंदयाचे वळण बसण्याचा विचार केला तर किमान ११ वर्षे तरी जागा देणे आवश्यक आहे.आपण गाळे धारकांना किती वर्षे गाळे देतो.दोघेही धंदा करतात.दोघांना एक सारखी वागणूक दया.दोन्ही अर्जदारांना त्यांची १वर्षा ची मुदत संपल्यावर पुढील ११वर्षा साठी जागा दया.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- अर्जदारांच्या व्यावसायाचा विचार करता ११ वर्ष मुदत वाढवून दया.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री. संपत बारस्कर :- अर्जदारांना ११ वर्ष मुदत वाढवून द्या.तसेच स्टोअर च्या निविदादरास ऑफिस रिपोर्टप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- श्री.भिमराज आनंदराव चितळे व श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांना व्यावसायासाठी दिलेल्या जागांची मुदत संपल्यावर ती मुदत आणखी ११ वर्षे इतकी वाढवून दयावी.याच विषय क्र.४४ मध्ये ठराव करावा. तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद जंतूनाशक द्रव्ये, पावडर इ. मालाचे खरेदीकामी मागविण्यांत आलेल्या कमीच्या निविदा दराच्या निविदेस ऑफिस रिपोर्ट नुसार मान्यता दयावी.

**ठराव :-**सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद जंतूनाशक द्रव्ये, पावडर इ. मालाचे खरेदीकामी मागविण्यांत आलेल्या कमीच्या निविदा दराच्या निविदेस ऑफिस रिपोर्टनुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.खर्च मंजूर.

तसेच श्री.भिमराज आनंदराव चितळे व श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांना व्यावसायासाठी अनुक्रमे अमरधाम कंम्पौंड लगत आणि कपिलेश्वर व्यायाम शाळे जवळ असलेली कराराने देण्यात आलेली खुली जागा एक वर्षाचा करार संपल्यावर तेथून पुढे ११ वर्षे इतक्या कराराने देण्यात यावी.या कामी वेळोवेळी नियमानुसार ठरविण्यात येणारे दरमहा भाडे व अनामत रक्कम घेण्यात यावी. या कामी आवश्यक ती सर्व कार्यालयीन पुर्तता मार्केट विभागाने करावी.यांस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४५ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट म्हणून मा.ॲड.मंगला राजेश कोठारी यांना अटक झाले बाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- मा.प्र.कामगार अधिकारी यांचे कडील जा.क्र. कोर्ट विभाग २०४ दि.२०/१२/२०१४ अन्वयेच्या प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.प्र.कामगार अधिकारी यांचे कडील जा.क्र. कोर्ट विभाग २०४ दि.२०/१२/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "ॲड. सौ. मंगला राजेश कोठारी यांना अटक झालेबाबत विविध वर्तमान पत्रात वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर त्यांचे कडील कामकाज हे महानगरपालिकेच्या इतर वकिलांकडे महानगरपालिकेचे हित पहाता देणेबाबत व त्यांचे मानधन स्थगित ठेवणेबाबत मंजुरी घेण्यात आली होती.तथापि सदरची प्रकरणे इतर विधीतज्ञांकडे वर्ग करण्यापुर्वीच श्रीमती कोठारी यांना मा.न्यायालयाने जामीन दिलेबाबत वर्तमान पत्रात वृत्त प्रसिध्द झाले व त्यानंतर त्यांनी दि.३१/१०/२०१४ पासुन पुर्ववत महानगरपालिकेचे कामकाज पहाण्यास सुरूवात केलेली आहे. ॲड. श्रीमती मंगला राजेश कोठारी यांची मानधनावर नियुक्ती मा.स्थायी समिती ठराव ४४ दि.८/७/२०१४ अन्वये झालेली असल्याने सदर बाब ही मा.स्थायी समितीच्या निर्देशनास आणणेस व त्याच बरोबर त्यांनी दि.३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबत. " नमुद केलेले आहे.

मा. स्थायी समिती ठराव क्र.४४ दि.८/७/२०१४च्या पारित ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये कामकाज पहाणे करीता पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून मा.ॲड. मंगला राजेश कोठारी यांची जा.क्र.आस्था.विभाग ३०७४ दि.३०/७/२०१४ अन्वये दि.१/८/२०१४ पासून पुढील आदेश होईपर्यत रू.१०,०००/- या दरमहा मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तरी मा.प्रभारी कामगार अधिकारी यांचे कडील जा.क्र.कोर्ट विभाग २०४ दि.२०/१२/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये कामकाज पहाणे करीता पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून मा.ॲड. मंगला राजेश कोठारी यांना अटक झाले बाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केलेली असल्याने सदरची बाब ही मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

००००

संदर्भ :- मा. नगरसचिव यांचेकडील जा.क्र. नगरसचिव विभाग व जा.क्र.३४६ दि.१३/०१/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवरील मा. ॲड. सौ. मंगला राजेश कोठारी यांना अटक झालेबाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबत सदरची बाब ही मा. स्थायी समितीच्या निर्देशनास आणणे बाबतचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र. आस्था. ३४६ दिनांक १३/१/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. तथापि सदर बाबत मा.नगरसचिव यांनी त्यांचेकडील जा.क्र. व नगरसचिव विभाग १०९ दिनांक २८/०८/२०१५ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट म्हणून मा. ॲड. सौ. मंगला राजेश कोठारी यांना अटक झालेबाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दि.३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर प्रस्तावास ४५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. आणि याबाबत मा. स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे नमूद करून कळविलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ मधील ३ (के) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , **समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील-** मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो - तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल. आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल. असे नमुद निर्देशित केलेले आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दि.२८/०८/२०१५ रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनूसुची "ड" प्रकरण २ मधील ३(के) मधील तरतूद पाहता आस्थापना विभागाने दि.१३/१/२०१५ रोजी मा. स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळवून पुढील कार्यवाही नगरसचिव विभागाने करणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची - "ड" प्रकरण २ चे ३ (के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे फेरसादर.

--***--

**चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट म्हणून मा.ॲड.मंगला राजेश कोठारी यांनाअटक झाले बाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दि.३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- अटक केव्हा झाली?

मा.सहाय्यक आयुक्त श्री.साबळे :-दि.२७/१०/२०१४ रोजी अटक झाली

मा.श्री.दिप चव्हाण :- त्याचा रिपोर्ट ठेवला का. आम्ही वकीलांची नेमणूक फक्त केली. आमचा कर्मचारी अटक झाला, ४८ तासात पोलीस कस्टडीत राहिला तर त्याचे रिपोर्टीग केले जाते.अटकेचे तुम्हाला नॉलेज कसे झाले.

मा.सहाय्यक आयुक्त श्री.साबळे :- कामगार विभागाने कळविले

मा.श्री.दिप चव्हाण :- कामगार विभागाला कोणी कळविले

प्र.कामगार अधिकारी श्री.खोलम :- पेपरला बातमी आली होती त्यावरून समजले.

मा.श्री.दिप चव्हाण :- पॅनलवरून त्यांना काढले का. कामकाज पाहू नये असा ठराव केला का. हे काम आमचे नसतांना आमच्याकडे का देता. आयुक्त दिवाळीच्या दिवशी कर्मचा-यांना सस्पेंड करतात. आम्ही त्या बाबत विचारले तर खुलासा मिळत नाही. कोणत्या कलमा खाली हा आजचा विषय ठेवला. आम्हाला तरतुद दाखवा.

मा.श्री.सचिन जाधव :- मधल्या कालावधीतील पेमेंन्ट काढण्याकरीता हा विषय घेतला असेल.

मा.उपायुक्त(सा):- मधल्या काळात आपण त्यांचे कामकाज स्थगीत केले होते. जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा काम पहाण्यास सुरूवात केली.स्थायी समितीला हा विषय माहिती असावा या करीता हा विषय घेण्यात आला.ज्या वेळी कामकाज स्थगीत केले त्यावेळीच हा विषय यायला पाहिजे होता.

मा.श्री.दिप चव्हाण :- मग तो विषय कंटिन्यू आला असता.

प्र.कामगार अधिकारी श्री.खोलम :- स्थगिती नंतर त्यांचे कडील प्रकरणे कोणाकडे दयायचे हा प्रश्न निर्माण झाला होता. दुस-या वकिलाची नेमणूक केली. दरम्यानच्या काळात त्यांना जामीन झाला व त्यांनी पुन्हा कामकाज पहायला सुरूवात केली.

मा.श्री.संपत बारस्कर :- चार पाच वकीलामध्ये काम भागते का. किती दावे दाखल आहेत.

प्र.कामगार अधिकारी श्री.खोलम :- माहिती दिली.

मा.श्री.दिप चव्हाण:- पॅनलवर फक्त नेमणूक करण्याचे काम स्थायी समितीचे आहे. तुम्ही जर त्यांना डिसमीस केले असते तर आमच्या कडे विषय आला असता. धर्यशिल वाडेकर यांनी राजीनामा दिला होता, तो विषय स्थायी समितीकडे आला, ते योग्य होते.निलंबित करायचे अधिकार कोणाला आहेत.डिसमीस करायचा अधिकार कोणाला आहे.असे विषय आमच्या पुढे आणू नका.

मा.श्री.संपत बारस्कर :- आपल्याकडे वकील किती आहे माहिती दया

प्र.कामगार अधिकारी श्री.खोलम :- माहिती दिली.

मा.श्री.संपत बारस्कर :- असे जर शेकडयाने प्रकरणे एका एका वकीलांकडे दिले तर काम कसे होईल.

मा.सभापती साहेब :-काही सदस्यांनी वकील नेमणेबाबत मागणी केली आहे. तीन जणांचे अर्ज प्राप्त झाले आहे

मा.श्री.दिप चव्हाण :- विषय क्र.४५ ला कनेक्ट करून चेअरमन साहेबांनी व इतर सदस्यांनी मागणी केल्या नुसार तीन नविन विधीज्ञ नेमणूका करण्यात याव्यात.

मा.श्री.संपत बारस्कर मी महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनलवर नियुक्ती करीता वकीलांच्या नावांची यादी सादर केली असून त्यांनुसार नियुक्ती करण्यात यावी.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट नुसार सादर केलेला विषय हा स्थायी समितीच्या निदर्शनास आला आहे.तथापी कामाची निकड पहाता आज स्थायी समितीच्या सदस्यांनी वकीलांची यादी देउन सुचवल्याप्रमाणे आणखी तीन विधिज्ञांची महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनलवर नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या मा.न्यायालयाकडे अनेक केसेस प्रलंबीत आहेत. मा.न्यायालयाकडील दिवाणी ,फौजदारी तसेच कामगार विभाग यांचेकडील असलेल्या केसेसचा निपटारा होण्यासाठी व महानगरपालिकेच्या कामकाजात गतीमानता निर्माण होण्या करीता मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्रीमती मंगल गुंदेचा मा.सौ.उषा नलावडे यांनी दिलेल्या यादी नुसार महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनवर नियुक्ती करण्यात यावी. विधिज्ञ आवश्यक आहेत.यादीतील तीन नविन विधीज्ञ पॅनेल वर नेमण्यात यावेत.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवरील कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट मा.ॲड.मंगला राजेश कोठारी यांनाअटक झालेनंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास पुन्हा सुरूवात केल्याबाबत मा.स्थायी समिती च्या निदर्शनास आले आहे.

तसेच मा.स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चे नुसार मा.न्यायालयाकडे महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या अनेक केसेस प्रलंबीत आहेत .मा.न्यायालयाकडील दिवाणी ,फौजदारी तसेच कामगार विभाग यांचेकडील असलेल्या केसेसचा निपटारा होण्यासाठी व महानगरपालिकेच्या कामकाजात गतीमानता निर्माण होण्या करीता मा.स्थायी समिती सदस्यांनी दिलेल्या यादीतील १)ॲड.सौ.भावना जितेंद्र पलिकुंडवार (कुल्लरवार),२) ॲड.सौ.सुचिता बाबर (वायकर), ३) ॲड.श्री.प्रसाद दिलीप गांगर्डे यांनी स्थायी समिती कडे अर्ज दिले असून त्यांची नियुक्ती अहमदनगर महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनलवर रू.१०,०००/- प्रती महिना इतक्या मानधनावर करण्यात यावी.विषय मंजूर, खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४६ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अंतर्गत कचरा वाहतूक करणे करिता कॅाम्पॅक्टर खरेदी कामी तसेच या अनुषंगाने लोखंडी कंटेनर (५० नग) खरेदी करणे कामी येणा-या खर्चा बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

संदर्भ :- १) घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.१९९ दि.२०/१०/२०१५

२)घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.३३१दि.३/२/२०१५

मा.सादर,

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की,केंद्रिय १२ व्या वित्त आयोगामधून महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १५ क्युबीक मीटर क्षमतेचे गारबेज कॉम्पॅक्टर व त्या अनुषंगाने १ टन क्षमतेचे लोखंडी कंटेनर [१०० नग] कचरा संकलन करून वाहतूक करण्याकरीता खरेदी करून मिळणेबाबतचा वरील संदर्भीय पत्र अनुक्रमे १ व २ प्राप्त झालेले आहेत.

तरी महानगरपालिकेच्या घनकचरा विभागासाठी १ गारबेज कॉम्पॅक्टर व १०० नग लोखंडी कंटेनर [१ टन क्षमतेचे] खरेदी करण्यास येणारा अंदाजे खर्च रू.३६ लाख खर्चास तसेच सोबतचा निविदा मसूदा महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ई निविदा प्रसिध्द करण्यास मंजूरी मिळावी, ही विनंती.

लेखा शिर्षक :- केंद्रिय १२ वा वित्त आयोग.

प्रस्ताव खर्च :- ३६ लाख

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा रिपोर्ट असे.

यावर मेकॅनिकल इंजि. यांचा अभिप्राय कि,अहवालानुसार मंजूरीस्तव सादर

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मो.व्हे. क्लार्क व मेकॉनिकल इंजि.यांच्या शिफारशीनुसार अ प्रमाणे प्रक्रिया करणेस हरकत नाही.प्रस्तुत ३६.०० च्या खरेदीकरीता नमुद लेखाशिर्षातर्गत उपलब्ध अनुदान किती आहे ?(मनपा अधि नि १९४९ क ८६)

यावर घनकचरा व्यावस्थापन प्रमुख यांचा अभिप्राय कि, कृ. शिल्लक तरतूदीबाबत माहिती देणे.

यावर मुख्यलेखाधिकरी यांचा अभिप्राय कि,दि.१०/०२/२०१५ अखेर रूपये ३६,८२,७७३.३८ कॅश बुकास शिल्लक आहेत.

यावर मोटार व्हेईकल क्लार्क श्री.पुंड यांचा अभिप्राय की,

फेरसादर,

उपरोक्त दि.१०/३/२०१५ अन्वये अकौंट विभागाने दिल्यानुसार रूपये ३६,८२,७७३.३८ इतके अनुदान शिल्लक आहे.

यावर मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,उपलब्ध अनुदानाच्या रकमेसह मंजूरीस्तव सादर.

यावर मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांनी घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख यांना जा.क२६दिनांक ३०/०४/२०१५ रोजी लेखी पत्र दिले कि,

विषय :- घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी कॉम्पॅक्टर व १०० नग कंटेनर खरेदी करण्या बाबत.

महोदय,

संदर्भीय विषयान्वये महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता एक नग कॉम्पॅक्टर व १०० नग कंटेनर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभागामार्फत खरेदी करणे बाबत सुचित केलेले आहे.

खरेदी अनुषंगाने या बाबतचे मा.शासनाचे दर करार यांचा अभ्यास केला असता एक कॉम्पॅक्टर खरेदी कामी अंदाजे ३५ ते ३६ लाख इतका खर्च येत आहे.तसेच १०० नग कंटेनर खरेदी कामी ८२ लाख इतका खर्च अपेक्षीत आहे.असे एकुण मिळून अंदाजे १ कोट १८ लाख इतका खर्च अपेक्षीत आहे.

परंतु सदयस्थितीत उक्त खरेदी कामी सदर लेखा शिर्षक ३६,८२,२०००/-इतकाच निधी शिल्लक आहे.या निधीमधून फक्त कॉम्पॅक्टर खरेदी होवू शकतो.कंटेनर खरेदी होवू शकत नाही.

करीता कॉम्पॅक्टर १ नग व कंटेनर १०० खरेदी बाबत योग्य ते अभिप्राय इकडेस देण्याचे करावे,जेणे करून खरेदी बाबतची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.कळावे ही विनंती.

वरील प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचे पत्र असे.

यावर घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर यांचा अभिप्राय कि,

फेरसादर,

बारावा वित्त आयोगमधील निधी व्दारे एक कॉम्पेक्टर खरेदी करणे शक्य आहे.तसेच सन २०१५-१६ या आर्थिक वर्षा करीता नविन वाहन खरेदी या लेखाशिर्ष रक्कम रूपये ५० लक्ष प्रस्तावित आहेत.या लेखाशिर्षातंर्गत शक्य तेवढे कंटेनर खरेदी योग्य होईल. तथापी पूढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर पुन्हा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,

फेरसादर,

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी १२ वा वित्त आयोग तसेच म.न.पा. निधी मधुन एक कॉम्पॅक्टर व ५० कंटंनर खरेदी बाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मंजुरीने म.न.पा. मोटार व्हेईकल विभागाकडे सादर करण्यात आला होता.

मोटार व्हेईकल विभागामार्फत सदर बाबत ई टेंडर प्रक्रिया सूरू करण्यात आली होती.मात्र दरम्यानचे काळात "न्यु साई फारबर" या संस्थेचे शासकिय दर प्राप्त झाले असुन त्या नुसार कॉम्पॅक्टर करीता रक्कम रूपये २०,५०,०००/- व चेसीस LPT 1613 PTO with cabin chasis ची किंमत १५,६८,६२५/- रूपये आहे.

तसेच कंटेनर्सची शासकीय दर हा ८२,०००/- प्रति नग असा आहे.

तरी एक कॉम्पॅक्टर खरेदी करणे करीता ३६,१८,६२५/- रूपये खर्च अपेक्षीत आहे.सदरचा खर्च बाराव्या वित्त आयोगातुन करणे शक्य होईल.

तसेच एकुण ५० कंटेनर्स शासकिय दारनुसार खरेदीस ४१,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे.सदरचा खर्च म..न.पा. निधी सन २०१५-१६ मधुन खरेदी करणे शक्य आहे.

तरी वरील खरेदी मे.साई फायबर,मिरज,महाराष्ट्र यांचेकडून शासकीय दारा ने खरेदीस व येणा-या खर्चास मा.स्थायी समिती च्या मंजूरीकरीता आदेशार्थ सादर.

तरी

१. कॉम्पॅक्टर एक नग शासकिय दर करार प्राप्त एजन्सी मे.साई फायबर,मिरज,सांगली यांचेकडून रक्कम रूपये २०,५०,०००/- इतक्या रकमेस १२ वा वित्त आयोग निधीतून (शिल्लक) खरेदी करणेस

२.कॉम्पॅक्टर बनविणे कामी लागणारी चेसीस एक नग LPT 1613 PTO with cabin अहमदनगर येथील अधिकृत मे शूभयान मोटर्स यांचेकडून शासकिय दर रक्कम रू.१५,६८,६२५/- १२ वा वित्त आयोगातून खरेदी करणेस

३) ५० कंटेनर्स शासकीय दर करार प्राप्त एजन्सी मे.साई फायबर मिरज सांगली यांचेकडून खरेदी करणेस एकुण ४१,००,०००/- रू म.न.पा. फंडातून खर्च करणेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

यावर मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,अहवालानुसार मा.स्थायी समिती चे मंजूरीस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक लिपीक यांचा अभिप्राय की, घनकचरा विभाग प्रमुख व मेकॉनिकल इंजि यांच्या शिफारशीनुसार अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि, अ नुसार मा.स्थायी समिती चे मंजूरीस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,

१.० प्रस्तावीत परि "अ " नुसार ई निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली असतांना थांबविण्याचे प्रयोजन काय होते ?दरम्यानच्या काळात "न्यु फायबर एजन्सीचे शासकीय दर " प्राप्त झाले असे प्रस्तावात नमुद आहे.तथापि प्रस्तुत दर हे प्राप्त झाले नसुन दि.३०-४-२०१५ चे पत्र देवून प्राप्त करून घेण्यात आल्याचे दिसून येते.

प्रस्तवित परी अ मध्ये नमुद आहे कि चेसीज 1613 TC 42 Truck chasis चे शासकिय दर /किंमत रूपये १५,६८,६२५/- आहे.तथापी अशी वस्तुस्थिती नसुन सदरचे दर हे टाटा मोटर्स चे डिलर्स चे दर आहेत.व संचिकेत सल्लग्न आहेत.व ते ई मेल १४६ / ६/५/२०१५अन्वये प्राप्त करून घेण्यात आल्याचे दिसून येते

दि.२०-५-२०१५ रोजी डी जी ॲण्ड. एस.डी. च्या अधिकृत संकेतस्थळावर अवलोकन केले असता चेसीस LPT 1613 TC 42 Truck chasis with cowl BS III चे दर हे Final Price Excl Mark up & Freig up Rs १३,०९,८४७/- आहेत व उपरोक्त डिलरचे दर LPT 1613/42 Cab ch BS III चे दर १५,६८,६२५/- नमूद आहेत.केबिनचे स्वतंत्र्य दर नमुद नाही.ई मेल १४६ / ६-५-२०१५ मध्ये असेही नमूद आहे की, LPT 1613/42 cabin chasis ही डी.जी.&एस.डी. च्या दरकरारा वर उपलब्ध नाही.असे असतांना रू.१५,६५,६२५/- हे डिलरने कळविलेले दर हे "शासकीय दर" असल्याचे नमूद करून दिशाभूल करण्यात आली आहे.

सबब काम्पॅक्टर च्या चेसीस बाबत आवश्यक Specificatn मो.वाहन विभागाने निश्चित करून required Specification व ISO दर्जाचे डी.जी.&एस.डी.दरकरारावरील उपलब्ध टाटा,अशोका,आयशर,इ.कंपन्यांपैकी किफायशीर व कमी किंमतीच्या चेसीस डी.जी.&एस.डी. दरकराराच्या किंमतीने खरेदी करणे आवश्यक ठरेल.

प्रस्ताव "अ" मध्ये रू.२०,५०,०००/- ची खरेदी "शासकीय दराने " म्हणून केंद्रीय भांडार कडून प्रस्तावित करण्यात आली आहे.

केंद्रीय भांडार हे केंद्रीय सरकारी कर्मचारी सहकारी संस्था मर्यादीत या मल्टीस्टेट सहकारी संस्थेचे आहेत.

न्यू साई फायबर ने कळविलेल दर हे www keudriybhandar gujrath.org या संकेत स्थळावर असून गुजराथ केंद्रीय भांडाराचे आहेत.महाराष्ट्र मुंबई,पुणे,येथेही केंद्रीय भांडाराची कार्यालये आहेत तथापि केंद्रिय भांडाराकडून खरेदी बंधनकारक नाही.

डी.जी.&एस.डी. अथवा उद्योग,उर्जा , कामगार विभाग,महाराष्ट्र शासन कडील दरकरारावर कॉम्पॅक्टर उपलब्ध असल्यास खरेदीस हरकत नाही अन्यथा यापूर्वी सुरू केलेल्या ई निविदा प्रक्रिया मनपा अधिनियम २०११ चे प्रकरण ५,कलम २ नुसार मोटार वाहन विभागाकडून आवश्यक स्पेसिफिकेशन्स निश्चित करून खरेदी करणे आवश्यक ठरते. / **ब**

कंटेनर खरेदी ही स्पेसिफि निश्चित करून डी.जी.&एस.डी. उदयोग उर्जा काम विभाग कडील उपलब्ध दरकरारावर अन्यथा मनपा अधिनियम २०११ चे प्र.५ क २ नुसार ई निविदे व्दारा करणे आवश्यक ठरते.

सन २०१५-१६ करता प्रस्तुत खरेदीचे लेखाशिर्ष मंजूर अनुदान झालेला खर्च शिल्लक/उपलब्ध अनुदान नमुद करून प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्तावित नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार व प्रस्तावित मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी मध्ये "ब" प्रमाणे नमूद केले प्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीस डी.जी.&एस.डी. दर करारा प्रमाणे खरेदी करणे उचित होईल तथापि मान्यतेकरीता सादर.

यावर मा.प्र.आयुक्त साहेब श्री.वालगुडे यांचा अभिप्राय कि, चर्च केली, उपरोक्त अहवालानुसार "ब" प्रमाणे कार्यवाही करणे कामी प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१३ पासुन महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सुध्दा कंटेनर खरेदी चा प्रस्ताव दिला होता ती फाईल आपल्या कडे प्रलंबित होती. अहमदनगर महानगरपालिकेची हद्दी मध्ये लोकसंख्या किती आहे? या लोकसंख्ये मागे किती कंटेनर लागतील,याचे काही निर्देश आहेत का.?

घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- लोकसंख्या बाबत काही निर्देश नाहीत, परंतु १५० ते २०० कंटेनरची आवश्यकता आहे.

मा.सभापती साहेब :- हि कंटेनर ची संख्या कशाच्या आधारावर काढली.

घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- ओपन डंपींग स्पॅाट वरून ही संख्या काढली आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेची ५ लाख लोकसंख्या आहे.माझ्या माहिती प्रमाणे ४४४ ओपन कुंडया आहेत, रस्त्यावर कोठेही कचरा पडतो आहे.ओपन प्लॅट वर कचरा साठलेला असतो,कालच पेपरमध्ये बालीकाश्रम रोड येथील कच-या बाबत फोटो आला आहे.१२ डिसेंबरच्या वृत्तपत्रात कचरा ओव्हर फलो झाल्याचा फोटो आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे क्षेत्र ८० चौ.कि.मी.असून नॉर्म नुसार ५०० मीटर करीता १ कंटेनर आवश्यक आहे. आपल्याकडे ३४ वॉर्ड आहेत.८ हजार ते १० हजार प्रभाग निहाय लोकसंख्या आहे.सद्यस्थतीत १० हजार लोकसंख्ये मागे काही प्रभागात एक व काही प्रभागात दोन तर काही प्रभागात एक सुध्दा कंटेनर नाही.३२ कंटेनर पैकी २ माझ्या वॉर्ड मध्ये आहेत.एकुण ३० कंटेनर कोठे आहेत. रस्त्यावर ओपनस्पेसमध्ये आहे.पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी स्वच्छ भारत मोहिम राबवतात घोषणा करतात, बजेटच्या किती टक्के खर्च घनकचरा व्यवस्थानावर करणे बंधनकारक आहे.

घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- एकुण बजेटच्या २५ टक्के खर्च करणे बंधनकारक आहे.

मा.सभापती साहेब :- आपला किती टक्के खर्च होतो.

घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- १० टक्के पेक्षा कमी खर्च होतो.

मा.सभापती साहेब : - मला हिशोब दया,मागील वर्षीची आकडेवावरी दया.जेणे करून शहर स्वच्छ दिसायला पाहिजे ते आपण करायला पाहिजे.स्वच्छता मोहिमेचे फोटो छापून येतात.गेल्या तीन वर्षापासून मी पाठपूरवठा करतो आहे.गेल्या तीन वर्षापासून शहराची कच-याच्या बाबतीत खुपच दयनिय अवस्था झाली आहे.

घनकचरा व्यावस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हाउस टू हाउस कलेक्शन साठी नॉर्म आहेत.

मा.सभापती साहेब :-घंटागाडी एकदा येवून गेल्या नंतर पुन्हा कचरा जमा होतो.माझ्याप्रभागात लोकसहभागातून पत्र्याच्या कुंडया तयार केल्या आहेत.ओपन प्लॉटमध्ये कचरा जमा होवून इतरत्र पसरत होता ते आता बंद झाले आहे.व एकाच ठिकाणी कचरा जमा होतो.कंटेनरच्या आजूबाजूचा परिसरातील कचरा स्वच्छ करणे बाबत आम्ही सूचना दिल्या.इतर बाबींवर आपण खर्च करतो मग शहर स्वच्छते करीता आपण प्रयत्न का करीत नाही.

मा.सभापती साहेब यांनी उपस्थीत सदस्यांना त्यांचे प्रभागातील आवश्यक कंटेनर बाबत विचारणा केली.त्या नुसार मा.सदस्यांनी त्यांचे प्रभागात आवश्यक मागणी केली.

मी आजच सकाळी गुगल वर स्वच्छते बाबत सर्च केली असता बाहेच्या देशात ठराविक अंतरावर जमीनीच्या आत कचरा कंटेनर आहेत.व त्या वरून नागरीक ये जा करू शकतात.आपल्या कडे सुध्दा जागोजागी कचरा कंटेनरची आवश्यकता आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- घंटागाडी दुरूस्तीचे किरकोळ बीले सुध्दा सहा महीने निघत नाही.त्या मुळे वहाने वेळेत दुरूस्त होत नाहीत.ते बीले पेड करायला सांगा.

मा.सभापती साहेब :- मुलभूत सोयीसाठी सहाय्या योजनेती रूपये ४० कोटी च्या निधी मध्ये घनकच-याबाबत काही घेतले आहे का,? माझे म्हणणे आहे की ,आपली १ गाडी येते ती दिवसभरात दोन कंटेनर कचरा डेपो पर्यत वहातुक करते.आपण जो कॉम्पॅक्टर घेणार तो कचरा उचलणार, टाकणार व दाबणार अशा दहा ते बारा कंटेनर मधील कचरा एका कॅाम्पॅक्टरमध्ये दाबतात.त्या मुळे जास्त कचरा वाहतुक होणार आहे.इंधनाची सुध्दा बचत होणार आहे.परंतु आशा अधुनिक साधनांची मागणी करण्या ऐवजी ठेकेदार एजन्सी नेमणूक करण्याचा महानगरपालिका अधिका-यांचा जास्त आग्रह असतो.साहीत्य खरेदी करण्याअधीच आपली ओरड चालू असते.ठेकेदाराला परवडते, मग आपल्या का परवडत नाही ?आता जी मागणी केली ती एका वेळेस १२ ते१५ कंटेनरमधील कचरा घेवून जाणार आहे.आधूनिकता कोणी नकोच म्हणते. त्या मुळे कॉम्पॅक्टर घेणे उपयुक्त आहे.उपायुक्त साहेब तुम्ही हे कसे करायचे ते पहा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची (२)'ड' प्रकरण ५ नियम मध्ये घेता येत असेल तर पहा. स्थायीसमीती कडे प्राप्त झालेल्या या प्रस्तावात तीन वेगवेगळया पुरवठादारांनी कोटेशन सादर केलेले आहेत.असे नमुद केलेले आहे. त्यांचेशी निगोशिएशन करा व लवकरात लवकर जो कोणी कमी दरात पुरवठा करायला तयार असेल त्याला कार्यारंभ आदेश देण्यात यावा.सदरचा कॉम्पॅक्टर खरेदीच्या खर्च १२ व्या किंवा १४ व्या आणि १०० कंटेनर खरेदीचा खर्च आयोगातून करण्यात यावा.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री .विसपुते :- दि.१०/०२/२०१५ अखेर १२ व्या वित्त आयोगात आज रोजी किती शिल्लक आहे. रूपये ३६,८२,७७३.३८ कॅश बुकास शिल्लक आहेत.

मा.उपायुक्त (कर) :- १२ व्या वित्त आयोगाचा निधी रूपये ३६.८२ लाख शिल्लक आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सन २०१२-१३ संदर्भात जो हेड होता तो कोणत्या हेड खाली होता.सन २०१३-१४ मध्ये तो ओढला का ? सन २०१५-१६ मध्ये रिॲपरोप्रिएशन पर्यत तरतूद तशीच आहे का ? चार वर्षा नंतर व्याज कीती मीळाले.या पुर्वी घनकच-या संदर्भात सुप्रिम कोर्टा च्या आदेशानुसार आरोग्य विभागा करीता १०० गाडया आपण घेतल्या आहेत.हा पार्ट एक वेगळा झाला.जे आरोग्य अधिकारी आहेत त्यांना दुसरे काम देता. मला सांगा आल्याकडे सन १९९९ ला हद्दवाढ झाली, त्यावेळेस तेव्हा आपल्या कडे किती कुंडया होत्या.

मा.उपायुक्त (कर) :- डॉ .पैठणकर माहीती द्या.

मा.डॉ.पैठणकर :- सन २००० पर्यत ३५० कुंडया होत्या.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्या पैकी किती बंद झाल्या आहेत ?

मा.डॉ.पैठणकर :- या मध्ये वाढच झाली आहे.नक्की सांगता येत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- ४४४ कुंडया कोठे गेल्या.या पुर्वी कमी कामगारांमध्ये तीन वेळा कचरा गाडी व्दारे कचरा उचलला जायचा.घारा नाल्याचे उदाहरण देतो.येथे सर्व अधिकारी आता नविन आहेत.यांना पुर्वीचे काही सांगता येत नाही.प्रभाग ३४ आहेत व नगरसेवक ७३ आहेत.कमीत कमी ७३ कंटेनरची मागणी ठेवली असतीतर ठिक होते.५० नग कंटेनर कोठे ठेवणार.सन २०१३ पासून पैसे पडले असतांना यां पूर्वी मागणी का केली नाही.४ वर्ष रक्कम पडलेली असून जर कोणी लक्ष देणार नसेल तर ही दुंदैवी बाब आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (२) ड प्रकरण ५ नियम मध्ये घेतला तर चालेल का.?

मा.उपायुक्त (कर) :- शासनाचा रेट कॉन्टॅक्ट आहे.कंटेनर संदर्भात शासनाचे रेट मंजूर नाहीत.१४ व्या वित्त आयोगात घनकचर-यावर ५० टक्के खर्च करण्याची तरतुद आहे.त्या वेळी कंटेनर खरेदी करू या या रक्कमेमध्ये फक्त कॉम्पॅक्टर खरेदी करू शकतो.

मा.श्री.दिप चव्हाण : - महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूची (२) ड प्रकरण ५ नियम प्रमाणे वेळ न जाता मंजूरी घेवून जे तीन पुरवठा दारांचे कोटेशन प्राप्त झालेले आहेत व जो कमी दर देईल त्यास निविदा न मागविता देता येईल की नाही त्या संदर्भात सांगा.

मा.उपायुक्त (कर):- तसा ठराव करावा लागेल.कंटेनर १४ व्या वित्त आयोगातून घेता येतील.

मा.श्री.दिप चव्हाण :- गव्हमेंट च्या डायरेक्शन आहेत.१४ व्या वित्त आयोगाच्या डायरेक्शन आहेत.मग त्यात बजेटचा काय अडथळा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूची (२) ड प्रकरण ५ नियम प्रमाणे निविदाप्रक्रियेत वेळ न घालवीता प्रोसिडिंग मध्ये नोंद घेवून १०० कंटेनर खरेदी करावी.

मा.उपायुक्त (कर) :- १२ व्या वित्त आयोगातून आवश्यक वाहनासह कॉम्पॅक्टर खरेदी व उरलेल्या रक्कमेत आणि १४ व्या वित्त आयोगातून कंटेनर खरेदी करता येतील.

मा.सभापती साहेब :- आवश्यक त्या वाहनासह १ नग कॉम्पॅक्टर व १०० नग कंटेनर खरेदी करा व त्याचे पेमेंट १२ व्या व १४ व्या वित्त आयोगातून करा. रिपोर्ट मध्ये लिहिलेले मटेरीयल पुरवण्यासाठी आज दोन पुरवठादारांचे दर स्थायी समिती समोर ठेवण्याकरीता माझ्याकडे आले आहेत. ते १. जय ट्रेडर्स, अहमदनगर व २.न्यु साई फायबर, मीरज असे आहेत. ते मी घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख,मेहेत्रे यांचेकडे देत आहे.त्यांचा विचार आजच्या सभेमध्ये करा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- दर व प्रस्ताव वाचा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- दर प्रस्ताव वाचले.

मा.दिप चव्हाण :- या प्रस्तावापैकी एकाची निवड करून कार्यवाही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ मधील नियम क्र.२(२) नुसार प्रशासन कार्यवाही करू शकेल का.?

मा.उपायुक्त (कर) :- मा.स्थायी समितीने या कामाची तातडी चर्चेमध्ये व्यक्त केली आहे. ती पहाता या तरतुदींप्रमाणे कार्यवाही करता येईल.तथापी तसा ठराव करणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- यापैकी कोणाला कार्यादेश देणे योग्य होईल.

मा.श्री.संपत बारस्कर :- .न्यु साई फायबर, मीरज हे पुरवठादार भारत सरकार यांचे केंद्रिय भांडार यांचे दर करारामध्ये समाविष्ट असल्याने त्याचे नमुद दर हे अत्यल्प प्रमाणात जादा असले तरी त्यांनी मध्ये त्याच दरात करावयाच्या कामाची क्षमता जास्त नमुद केले आहे. त्यामुळे या दोन्ही बाबींचा विचार करता न्यु साई फायबर, मीरज यांना काम देण्यात यावे परंतू त्याबाबत पुढील सर्व आवश्यक कार्यवाही प्रशासनाने अवश्यक ते कार्यालयीन सोपस्कार करून पुर्तता करून करावी.

मा.दिप चव्हाण :- हॉटेल मधून कचरा जमा करण्यासाठी डोनर शोधा.

मा.सभापती साहेब :- मंगलकार्यालयात महानगरपालिकेमार्फत कंटेनर टेवण्यात आले आहेत.कंटेनर आपले व पैसे ते कमावतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- असे कंटेनर त्वरीत काढून घ्या.जे मोठे हॉस्पीटल आहे त्यांना डोनर म्हणून घ्या.

मा.श्री.संपत बारस्कर :- आधीच खुप उशीर झालेला आहे. निधी शिल्लक असतांना सुध्दा खरेदी केलेली नाही तरी आता वेळ न घालवीता त्वरीत खरेदी करणे आवश्यक आहे.सदर विषय मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- सदर विषय मंजूर करावा व त्वरीत कॉम्पॅक्टर व कंटेनर खरेदी करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मंगलकार्यालयाने स्वतः कच-याची व्यवस्था करायची व कचरा डेपोवर त्यांनी स्व -खर्चा ने विल्हेवाट लावावी.कंटेनर तेथून काढावेत असा ठरावात उल्लेख करा.जे तीन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्याचेशी चर्चा करा जे कमीत कमी दराने देतील त्याला मंजूरी दया. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनूसूची ड चे प्रकरण ५मधील नियम क्र.२ (२) नुसार प्रशासनाने आवश्यक त्या वाहनासह १ नग कॉम्पॅक्टर व १०० नग कंटेनर खरेदी करण्याची कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>** कार्यालयीन प्रस्ताव व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या वर्णनाचे आवश्यक त्या वाहनासह १ नग कॉम्पॅक्टर १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त निधीतून खरेदी करणेस तसेच याकामी ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद प्रमाणे चेसी खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त १०० नग कंटेनर १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त रक्कमेतून खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच चर्चे मध्ये प्रस्तुत प्रकरणी झालेल्या विलंबा बाबत व्यक्त केलेल्या भावनांचा विचार, अहमदनगर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम -२००० ची अंमलबजावणी काटेकोर करण्यासाठी वेळोवेळी हरित न्यायालयाने,मा. महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ यांचे निर्देश तसेच मागील दिड वर्षापुर्वी मे.हरीत न्यायालय पुणे यांनी अहमदनगर महानगरपालिकेवर घनकचरा व्यवस्थापन बाबत दंडनीय कारवाई केली आहे.

या वरील बाबींचा विचार करता स्थायीसमीती कडे १. जय ट्रेडर्स, अहमदनगर व २.न्यु साई फायबर, मीरज या दोन वेगवेगळया पुरवठादारांनी कॉम्पॅक्टर व कंटेनरचे निविदा दर सादर केलेले आहेत. त्यांचेशी स्थायी समिती समोर झालेल्या वाटाघाटीं नुसार न्यु साई फायबर, मीरज यांचेकडून नमुद यंत्रसासामुग्री घेण्याकामी कार्यारंभ आदेश देण्यात यावा. न्यु साई फायबर, मीरज हे पुरवठादार भारत सरकार यांचे केंद्रिय भांडार यांचे दर करारामध्ये समाविष्ट असल्याने त्याचे नमुद दर हे अत्यल्प प्रमाणात जादा असले तरी त्यांनी मध्ये त्याच दरात करावयाच्या कामाचे एकक जास्त नमुद केले आहे.त्यामुळे या दोन्ही बाबींचा विचार करता न्यु साई फायबर, मीरज यांचेशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण ५ मधील नियम क्र.२(२) नुसार प्रशासनाने विना निविदा आवश्यक त्या चेसीस वाहनासह १ नग कॉम्पॅक्टर व १०० नग कंटेनर खरेदी बाबत संविदा करण्याची कार्यवाही करावी.

१२व्या वित्त आयोगाचा निधीपैकी काही रक्कम गेल्या ४ ते ५ वर्षांपासून अखर्चीत असल्याने शिल्लक आहे. तसेच हा निधी प्रस्तावीत कारणांकरीता वापरण्याकरीताच आहे असे चर्चे मध्ये सांगितले असल्याने कॉम्पॅक्टर खरेदीच्या खर्च १२ व्याआणि कंटेनर खरेदीच्या खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून अथवा अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन करण्यात यावा.या कामी त्वरीत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत प्रकरणी ठराव प्राप्त होताच तीन दिवसात संविदा करण्याची कार्यवाही आयुक्तांनी पुर्ण करावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४७ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सय्यद फैय्याज अय्युब रा.घर नं.१३/९,गजानन सोसायटी ,जुना मुकुंदनगर,अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८७, बील क्रमांक १८६, नळ कनेक्शनची बंद केले असतांना आकारण्यात आलेल्या पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ३

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,श्री.सय्यद फैय्याज अय्युब यांनी ११-११-२०१४ रोजी घर नं.१३/९,गजानन सोसायटी,जुना मुकंदनगर येथे घर आहे.सदर घरामध्ये नळ कनेक्शन होते सन २००८ साली संपूर्ण रक्कम भरून नळ कनेक्शन बंद करणे बाबत अर्ज सादर केलेला आहे.सदर अर्जानुसार नळ कनेक्शन बंद करण्यात आलेले आहे.मात्र सदर नळ कनेक्शनची पाणीपट्टी बिलामध्ये येत आहे. त्यामुळे पाणीपट्टीची आकारणी रद्द करावी असा अर्ज सादर केलेला आहे.

या बाबत वास्तविक परिस्थिती अशी की,वॉर्ड क्र.८७ बील क्र१८६ वर श्री सय्यद फैय्याज अय्युब यांची मिळकत आहे.सदर मिळकतीवर सन २०१४ ते २०१५ अखेर घरपट्टी रू.७०९९/- व पाणीपट्टी १०५००/- असे दोन्ही मिळून रू.१७५९९/- इतकी शास्तीसह थकबाकी आहे.

या प्रभागाकडील जा.क्र. सी-०९३०५ दि.२४-११-१४ अन्वये पाणी पुरवठा फिटर ,प्रभाग समिती क्र.३ यांना सदर ठिकाणी नळ कनेक्शन आहे किंवा कसे ? या बाबत अहवाल देणे बाबत कळविले आहे.सदर पत्रा च्या अनुषंगाने पा.पु.फिटर यांनी श्री सय्यद फैय्याज अय्युब घर नं.१३/९ गजानन हौसिंग सोसायटी जुना मुकुंदनगर येथे नळ कनेक्यान नाही असा अहवाल पाणी पुरवठा जा.क्र.सी-०६१६ दि.३३-१-१५ रोजी सादर केलेला आहे.

या प्रभागाकडील पाणी पुरवठा फिटर यांनी सदर घरामध्ये नळ कनेक्शन नसल्याचे कळविले असल्याने मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४८५ प १५२ नुसार सन २०१४-१५ अखेर पाणीपट्टी रक्कम रु.१०,०००/- व त्यावरील नोटीस फी/ शास्तीची रक्कम निर्लेखित करणेस्तव आदशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्रभाग समिती क्र.३ व वॉर्ड क्रमांक ८७ चे वसुली लिपीक यांचा अहवाल व असे.

यावर सहा.मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय कि, वसुली क्लार्क यांचे प्रस्तावानुसार व पाहणी समितीने दिलेल्या अहवालानुसार सदर मालमत्तेत नळ कनेक्शन नसल्याने त्यावर लागलेली पाणीपट्टी व शास्ती १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीचे मान्यतेसाठी पाठविणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,पाणीपट्टी निर्लेखित व शास्तीमाफी या भिन्नबाबी असल्याने निर्लेखित बाब हे मा.स्थायी समितीकडे पाठविणेस व शास्तीमाफी बाब ही धोरनात्मक असल्याने सक्षम प्रधिकरणाकडे पाठवून सहाय्यक मुल्य निर्धारक,कर संकलन अधिकारी यांचे शिफारशीनुसार कार्यवाहीस्तव हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम अनुसुची ड ,प्रकरण ८ ,कराधान नियम मधील नियम २०(१) ब नुसार कार्यवाहीचा प्रस्ताव करता येईल का? तपासून फेरसादर करणे

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ यांचा अभिप्राय कि,फेरसादर, विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची ड प्रकरण ८ कराधान नियम २०(१) क नुसार कार्यवाही करणे उचित होणार नाही मात्र कलम ४८५ व १५२ नुसार पाणीपट्टी निर्लेखित करता येते तसेच त्यावरील शास्ती रक्कम कराधान नियम ५१ अन्वये पुर्णतः किंवा अंशतः माफी देता येते आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्रायम कि,उपरोक्त प्रमाणे व मुलेप यांचे अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.
यावर मा.अतीरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय कि, "अ" नुसार प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांना पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.सौ.उषा ठाणगे :-यापुर्वी १०००/-रूपये घेवून नळकनेक्शन अधिकृत करणे बाबत महानगरपालिकेमार्फत योजना राबविण्यात आली.सदर ची योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत नागरीकांची मागणी असून नागरीकांचा त्रास कमी होईल व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल या करीता या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यत मुदत वाढ देण्यात यावी. मी याकरिता आयुक्तांना पत्र दिले आहे. त्याची प्रत आता समितीपुढे विचारार्थ ठेवीत आहे. त्यावर निर्णय घ्यावा.

मॅके.इंजि.श्री.निकम :- नोटीस नुसार नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी एक महिना कालावधी दिला होता त्यानंतर नव्याने सर्व्हे करण्यात आला आहे.व मुदतवाढ प्रस्तावित करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- एक महिना मुदत वाढ करण्याबाबत ठराव करण्यात यावा. एका प्रभागाकरीता दोन कचरा कंटेनर कंम्पलसरी देण्यात याव्यात तसा ठरावात उल्लेख करण्यात यावा.जे उरतिल ते नंतर पाहू

मा.श्री.दिप चव्हाण :- पैठणकर साहेबांना घनकचरा विभागातून का काढले तेथे मेहेत्रे इंजिनियर आहेत. त्या पदाचा माणूस जर त्या विभागाकडे नसेल तर विभागाचे काम कार्यक्षम पणे कसे चालेल.मा.उपायुक्त , मा.महापौर साहेब यांना त्यांच्या कामकाजामध्ये काही त्रुटी आढळल्या त्या मुळे त्यांचेकडून कामकाज काढून घेण्यात आले. त्यांच्या कामातील तरी दूर पण ज्या कर्मचा-यांला त्या कामाचे ज्ञान आहे त्याला ते काम द्या. तर काम चांगले होईल. तेथे इंजि. नेमून का एखादी फाईल त्यांचे कडे दयायची नसेल तेव्हडी सोडून घनकचरा व्यवस्थपनाचे काम त्यांचे कडे देण्यात यावे.कोणची अडचण असेल तर आम्ही त्यांचेशी चर्चा करू आम्हाला या संदर्भात उत्तर दया एखादयाला पदोन्नती देता त्याला पदोन्नतीचा पगार देता व त्याला आवक जावक चे काम देण्यात येते. कामकाजात सुधारणा होणार की नाही श्री.पैठणकर यांना कोणते काम दिले आहे.

मा.उपायुक्त :- मलेरिया विभागाचे काम दिले आहे

मा श्री दिप चव्हाण आयुक्त साहेब एकदाही स्थायी समिती सभेमध्ये आले नाहीत,आयुक्तांचे सभेस आल्यास आयुक्तांचे डिव्हॅल्युएशन होत नाही. अतिरीक्त आयुक्त सुध्दा सभेस येत नाही त्यांनी यायला पाहिजे श्री.पैठणकरांकडे आरोग्याचे काम दयावे नाहीतर आम्ही महानगरपालिकेत कोणाकडे कोणत्या विभागाचे काम कसे दिले जाते याचा ठराव करून आम्ही शासनाकडे पाठवू. काय करणार ते सांगा. त्यांची बदली करणार की नाही.

मा.उपायुक्त कर :- स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चा नुसार व सदस्यांच्या मागणीनुसार पैठणकारांच्या बदलीची फाईल मा.आयुक्त साहेब यांचे कडे पुट अप करू.

मा.सौ.उषा ठाणगे:-कल्याणरोड येथे चार इंची पाईपलाईन टाकून मिळावी याबाबत मागणी केली.महानगरपालिकेचा टॅकर वरील होणारा खर्च वाचणार आहे.मेकॅनिकल इंजि श्री.निकम मागणी केली त्यानुसार पाहणी करून कार्यवाही करू मा.सभापती साहेब पहाणी करून आवश्यक ती कार्यवाही करा. वॉर्ड क्र २५ मध्ये रस्ते खोदण्यात आले होते ते बुजविण्यात आले त्या ठेकेदाराचे पेमेंट अदयाप काढलेले नाही

मा.सौ. सुनिता कांबळे :- विषय क्रमांक ४७ ते ४९ ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे. तसेच सौ. उषा शरद ठाणगे यांनी दिलेल्या पत्रावरील ठराव हा विषय क्र.४८ च्या ठरावात समाविष्ट करावा.

मा. श्री. संपत बारस्कर :- सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्रमांक ४७ ते ४९ हे विषय घरपट्टी, पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत. त्यांची घरपट्टी व पाणीपट्टी जे रिपोर्टमध्ये नमूद असेल ते निर्लेखित करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार सय्यद फैय्याज अय्युब रा.घर नं.१३/९,गजानन सोसायटी ,जुना मुकुंदनगर,अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८७, बील क्रमांक १८६, नळ कनेक्शनची बंद केले असतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टी ऑफिस रिपोर्टनुसार रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा. सौ. सुनिता कांबळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४८ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार घेवरचंद चांदमल बोरा तर्फे श्री राजेंद्र चंपालाल मुथ्था दाणे डबरा अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७६५, नळ कनेक्शनची नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार नळ कनेक्शन नसल्याने सन २०१५ अखेर ची पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ३

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,श्री.घेवरचंद बोरा तर्फे श्री.राजेंद्र चंपालाल मुथ्था यांनी वरील संदर्भानुसार अर्ज सादर केलेला आहे.सदर अर्जामध्ये वॉर्ड क्र.४ बिल क्र.७६५ घर नं.१२६२,दाणे डबरा, अहमदनगर या ठिकाणी कधीही नळ कनेक्शन घेतलेले नाही त्यामुळे पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करावी व मी सन २०१३-१४ अखेर अदा केलेली पाणीपट्टी रक्कम समायोजित करावी.

या बाबत वास्तविल परिस्थिती अशी की,वॉर्ड क्र.४ बिल क्र.७६५ श्री.घेवरचंद चांदमल बोरा या नांवे मिळकत आहे.सदर मिळकतीवर सन २०१५-१६ अखेर घरपट्टी/ पाणीपट्टी रक्कम १३५७८ /- इतकी आजमितीस शास्तीसह थकबाकी आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने या प्रभागाकडील जा.क्र.३००३दि.८-४-२०१५अन्वये पाणीपुरवठा फिटर यांना वॉर्ड क्र.४बिल क्र.७६५घर नं.१२६२, दाणे डबरा,अहमदनगर या मिळकतीची समक्ष पाहणी करून नळ कनेक्शन आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केलेले आहे.त्यानुसार पाणी पुरवठा फिटर यांनी समक्ष जागेची पाहणी व चौकशी केली असता सदर ठिकाणी गाहा असून त्याला नळ कनेक्शन नसल्याचे आढळून आलेले आहे.असा अहवाल जा.क्र.४४१५दि.२-६-२०१५अन्वये सादर केलेला आहे.

वरील अर्जानुसार व पाणी पुरवठा फिटर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी दिनांक २०-५-२०१५ रोजी गठीत समितीने समक्ष पाहणी केली असता नळ कनेक्शन आढळून आलेल नाही.त्यामुळे बिल क्र.७६५ सन २०१५/१६ अखेर पाणीपट्टी रक्कम रू.६०००/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणे उचित वाटते तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम मधील कलम ५१ अन्वये शास्तीची रक्कम कमी करणेस्तव आदशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस वॉर्ड क्र.४ यांचा अहवाल असे.

यावर प्र.प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय कि, अ नुसार मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर कर मृल्य निर्धारण संकलन अधिकारी यांचा अभिप्राय कि, कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सदर मालमत्तेत नळ कनेक्शन नसुन बिलामध्ये पाणीपट्टी येत आहे.त्यानुसार दि.३०/५/२०१५ रोजीचा पाहणी अहवाल सोबत जोडलेला असून त्यामध्ये सुध्दा नळ कनेक्शन नसलेबाबत सुचित केले आहे.महाराष्ट्र मनपा अधि.मधील कलम १५२ नुसार सन १५-१६ अखेरची पाणीपट्टी निर्लेखित करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागणार असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,मुळ पाणीपट्टी टाचण रजिष्टर लेखापरिक्षण विभागास सादर करा.

यावर वसूली लिपीक यांचा अभिप्राय कि, पान.नं.२९२ वर टाचण रजिस्टरला नोंद आहे.परंतु ती चुकीची आहे.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम मधील २०,१ (फ) नुसाद कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांना पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.सौ.उषा ठाणगे :-यापुर्वी १०००/-रूपये घेवून नळकनेक्शन अधिकृत करणे बाबत महानगरपालिकेमार्फत योजना राबविण्यात आली.सदर ची योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत नागरीकांची मागणी असून नागरीकांचा त्रास कमी होईल व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल या करीता या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यत मुदत वाढ देण्यात यावी. मी याकरिता आयुक्तांना पत्र दिले आहे. त्याची प्रत आता समितीपुढे विचारार्थ ठेवीत आहे. त्यावर निर्णय घ्यावा.

मॅके.इंजि.श्री.निकम :- नोटीस नुसार नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी एक महिना कालावधी दिला होता त्यानंतर नव्याने सर्व्हे करण्यात आला आहे.व मुदतवाढ प्रस्तावित करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- एक महिना मुदत वाढ करण्याबाबत ठराव करण्यात यावा. एका प्रभागाकरीता दोन कचरा कंटेनर कंम्पलसरी देण्यात याव्यात तसा ठरावात उल्लेख करण्यात यावा.जे उरतिल ते नंतर पाहू

मा.श्री.दिप चव्हाण :- पैठणकर साहेबांना घनकचरा विभागातून का काढले तेथे मेहेत्रे इंजिनियर आहेत. त्या पदाचा माणूस जर त्या विभागाकडे नसेल तर विभागाचे काम कार्यक्षम पणे कसे चालेल.मा.उपायुक्त , मा.महापौर साहेब यांना त्यांच्या कामकाजामध्ये काही त्रुटी आढळल्या त्या मुळे त्यांचेकडून कामकाज काढून घेण्यात आले. त्यांच्या कामातील तरी दूर पण ज्या कर्मचा-यांला त्या कामाचे ज्ञान आहे त्याला ते काम द्या. तर काम चांगले होईल. तेथे इंजि. नेमून का एखादी फाईल त्यांचे कडे दयायची नसेल तेव्हडी सोडून घनकचरा व्यवस्स्थपनाचे काम त्यांचे कडे देण्यात यावे.कोणची अडचण असेल तर आम्ही त्यांचेशी चर्चा करू आम्हाला या संदर्भात उत्तर दया एखादयाला पदोन्नती देता त्याला पदोन्नतीचा पगार देता व त्याला आवक जावक चे काम देण्यात येते. कामकाजात सुधारणा होणार की नाही श्री.पैठणकर यांना कोणते काम दिले आहे.

मा.उपायुक्त :- मलेरिया विभागाचे काम दिले आहे

मा श्री दिप चव्हाण  आयुक्त साहेब एकदाही स्थायी समिती सभेमध्ये आले नाहीत,आयुक्तांचे सभेस आल्यास आयुक्तांचे डिव्हॅल्युएशन होत नाही. अतिरीक्त आयुक्त सुध्दा सभेस येत नाही त्यांनी यायला पाहिजे श्री.पैठणकरांकडे आरोग्याचे काम दयावे नाहीतर आम्ही महानगरपालिकेत कोणाकडे कोणत्या विभागाचे काम कसे दिले जाते याचा ठराव करून आम्ही शासनाकडे पाठवू. काय करणार ते सांगा. त्यांची बदली करणार की नाही.

मा.उपायुक्त कर :- स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चा नुसार व सदस्यांच्या मागणीनुसार पैठणकारांच्या बदलीची फाईल मा.आयुक्त साहेब यांचे कडे पुट अप करू.

मा.सौ.उषा ठाणगे:-कल्याणरोड येथे चार इंची पाईपलाईन टाकून मिळावी याबाबत मागणी केली.महानगरपालिकेचा टॅकर वरील होणारा खर्च वाचणार आहे.मेकॅनिकल इंजि श्री.निकम मागणी केली त्यानुसार पाहणी करून कार्यवाही करू मा.सभापती साहेब पहाणी करून आवश्यक ती कार्यवाही करा. वॉर्ड क्र २५ मध्ये रस्ते खोदण्यात आले होते ते बुजविण्यात आले त्या ठेकेदाराचे पेमेंट अदयाप काढलेले नाही

मा.सौ. सुनिता कांबळे :- विषय क्रमांक ४७ ते ४९ ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे. तसेच सौ. उषा शरद ठाणगे यांनी दिलेल्या पत्रावरील ठराव हा विषय क्र.४८ च्या ठरावात समाविष्ट करावा.

मा. श्री. संपत बारस्कर :- सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्रमांक ४७ ते ४९ हे विषय घरपट्टी, पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत. त्यांची घरपट्टी व पाणीपट्टी जे रिपोर्टमध्ये नमूद असेल ते निर्लेखित करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार घेवरचंद चांदमल बोरा तर्फे श्री राजेंद्र चंपालाल मुथ्था दाणे डबरा अ.नगर, प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७६५, नळ कनेक्शनची पाणीपट्टी ऑफिस रिपोर्टनुसार निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

तसेच मा.नगरसेविका सौ.उषा शरद ठाणगे यांनी मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांना अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणे या मोहिमेस मुदतवाढ मिळणेबाबत दिलेल्या पत्राची प्रत मा.सभापती यांना सभेत दिल्यानुसार व शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणेसाठी रककम रू.१०००/- दंडनीय आकार अधिक नियमीत शुक्ल भरून अधिकृत करणेसाठी चे योजनेला मुदतवाढ देणेबाबत दिलेल्या पत्रावर झालेल्या चर्चेनुसार शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याच्या मोहिमेस दि.३१ मार्च २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यास हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. सुनिता कांबळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४९ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार,प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ४३०, नळ कनेक्शनची नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार नळ कनेक्शन नसल्याने सन २०१४- २०१५ अखेर ची पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ३

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार यांनी वरील संदर्भानुसार इकडेस अर्ज देवून विनंती केलेली आहे की,माझा सब्ज अपार्टमेंट मध्ये गाळा क्र.१ असून सदर गाळयाला नळ कनेक्शन नसतांनाही पाणीपट्टीचे बिल देण्यात आलेले आहे.सदर ठिकाणीची समक्ष पाहणी करून बील दुरूस्त करून मिळावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.४ बी.क्र.४३० वर श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार या नांवे मिळकत आहे.सदर मिळकतीचा वापर वाणिज्य आहे.त्यांच्या नावे सन मार्च २०१५ अखेर घरपट्टी रू.२२२११/- व पाणीपट्टी रू.१२०००/- असे दोन्ही मिळून रू.३४२११/- इतकी आजमितीस शास्तीसह थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने या प्रभागाकडील जा.क्र.१०३४ दि.३-२-२०१५ अन्वये पाणी पुरवठा फिटर यांना सदर ठिकाणी नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.सदर पत्रानुसार मा.शाखा अभियंता यांनी श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार,बेसमेंट गाळा क्र.१,सब्ज अपार्टमेंट वॉर्ड क्र.४ बिल क्र.४३० या मिळकतीची पा.पु.फिटर यांनी पाहणी व चौकशी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याचे आढळून आलेले आहे.असा अहवाल पाणी पुरवठा जा.क्र.१६०३ दि.२४-२-२०४१५ अन्वये इकडेस सादर केलेला आहे.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३मधील पाणीपुरवठा फिटर यांच्या अहवालानुसार सन २०१४-१५ अखेर पाणीपट्टीची रक्कम रू.१२०००/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार कमी करणेस्तव व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान कलम ५१ नुसार शास्तीची रक्कम कमी करणे संयुक्तीक वाटते.तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस वार्ड क्र.३ यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग समिती क्रमांक ३ यांचा अभिप्राय कि, अ नुसार मान्यतेस तथा आदशार्थ सादर.

यावर सहाय्यक मृल्य निर्धारण कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय कि, कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सदर मालमत्तेत नळ कनेक्शन नाही.त्याबाबत दि.२४/४/२०१५ रोजी पाहणी करण्यात आली.त्यामध्ये नळ कनेक्शन नसल्याचे आढळून आले.महाराष्ट्र मनपा अधि.मधील कलम १५२ नुसार सन १५-१६ अखेरची पाणीपट्टी निर्लेखित करणेकरिता मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल व त्याच प्रमाणे पाणीपट्टीच्या थकबाकीवर लागलेली शास्ती मा.स्थायी समितीच्या मान्यतेनंतर कमी करणे उचित वाटते.सबब आदेशार्थ सादर.

यावार मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, स.मु.नि.क.सं.अ.,वसुली मदतनीस यांनी सदरहू मिळकतीत अर्धा इंच दोन नळ कनेक्शन असल्याचे नमूद केलेले आहे.सबब मुळ टाचण रजिष्टर लेखा परिक्षणास हजरकरणे योग्य ठरेल जनरल पाणीपट्टी बद्दल खात्री करणे आवश्यक ठरते.

यावर वसूली लिपीक यांचा अभिप्राय कि,पा.नं.१६३ वर टाचण रजिष्टरला नोंद आहे.परंतू ती चुकीची आहे.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधी २०१२ चे प्रकरण ८ कराधान नियम २०,१ (फ) नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,प्रस्तावितनुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांना पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.सौ.उषा ठाणगे :-यापुर्वी १०००/-रूपये घेवून नळकनेक्शन अधिकृत करणे बाबत महानगरपालिकेमार्फत योजना राबविण्यात आली.सदर ची योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत नागरीकांची मागणी असून नागरीकांचा त्रास कमी होईल व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल या करीता या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यत मुदत वाढ देण्यात यावी. मी याकरिता आयुक्तांना पत्र दिले आहे. त्याची प्रत आता समितीपुढे विचारार्थ ठेवीत आहे. त्यावर निर्णय घ्यावा.

मॅके.इंजि.श्री.निकम :- नोटीस नुसार नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी एक महिना कालावधी दिला होता त्यानंतर नव्याने सर्व्हे करण्यात आला आहे.व मुदतवाढ प्रस्तावित करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- एक महिना मुदत वाढ करण्याबाबत ठराव करण्यात यावा. एका प्रभागाकरीता दोन कचरा कंटेनर कंम्पलसरी देण्यात याव्यात तसा ठरावात उल्लेख करण्यात यावा.जे उरतिल ते नंतर पाहू

मा.श्री.दिप चव्हाण :- पैठणकर साहेबांना घनकचरा विभागातून का काढले तेथे मेहेत्रे इंजिनियर आहेत. त्या पदाचा माणूस जर त्या विभागाकडे नसेल तर विभागाचे काम कार्यक्षम पणे कसे चालेल.मा.उपायुक्त , मा.महापौर साहेब यांना त्यांच्या कामकाजामध्ये काही त्रुटी आढळल्या त्या मुळे त्यांचेकडून कामकाज काढून घेण्यात आले. त्यांच्या कामातील तरी दूर पण ज्या कर्मचा-यांला त्या कामाचे ज्ञान आहे त्याला ते काम द्या. तर काम चांगले होईल. तेथे इंजि. नेमून का एखादी फाईल त्यांचे कडे दयायची नसेल तेव्हडी सोडून घनकचरा व्यवस्स्थपनाचे काम त्यांचे कडे देण्यात यावे.कोणची अडचण असेल तर आम्ही त्यांचेशी चर्चा करू आम्हाला या संदर्भात उत्तर दया एखादयाला पदोन्नती देता त्याला पदोन्नतीचा पगार देता व त्याला आवक जावक चे काम देण्यात येते. कामकाजात सुधारणा होणार की नाही श्री.पैठणकर यांना कोणते काम दिले आहे.

मा.उपायुक्त :- मलेरिया विभागाचे काम दिले आहे

मा श्री दिप चव्हाण आयुक्त साहेब एकदाही स्थायी समिती सभेमध्ये आले नाहीत,आयुक्तांचे सभेस आल्यास आयुक्तांचे डिव्हॅल्युएशन होत नाही. अतिरीक्त आयुक्त सुध्दा सभेस येत नाही त्यांनी यायला पाहिजे श्री.पैठणकरांकडे आरोग्याचे काम दयावे नाहीतर आम्ही महानगरपालिकेत कोणाकडे कोणत्या विभागाचे काम कसे दिले जाते याचा ठराव करून आम्ही शासनाकडे पाठवू. काय करणार ते सांगा. त्यांची बदली करणार की नाही.

मा.उपायुक्त कर :- स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चा नुसार व सदस्यांच्या मागणीनुसार पैठणकारांच्या बदलीची फाईल मा.आयुक्त साहेब यांचे कडे पुट अप करू.

मा.सौ.उषा ठाणगे:-कल्याणरोड येथे चार इंची पाईपलाईन टाकून मिळावी याबाबत मागणी केली.महानगरपालिकेचा टॅकर वरील होणारा खर्च वाचणार आहे.मेकॅनिकल इंजि श्री.निकम मागणी केली त्यानुसार पाहणी करून कार्यवाही करू मा.सभापती साहेब पहाणी करून आवश्यक ती कार्यवाही करा. वॉर्ड क्र २५ मध्ये रस्ते खोदण्यात आले होते ते बुजविण्यात आले त्या ठेकेदाराचे पेमेंट अदयाप काढलेले नाही.

मा.सौ. सुनिता कांबळे :- विषय क्रमांक ४७ ते ४९ ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे. तसेच सौ. उषा शरद ठाणगे यांनी दिलेल्या पत्रावरील ठराव हा विषय क्र.४८ च्या ठरावात समाविष्ट करावा.

मा. श्री. संपत बारस्कर :- सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्रमांक ४७ ते ४९ हे विषय घरपट्टी, पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत. त्यांची घरपट्टी व पाणीपट्टी जे रिपोर्टमध्ये नमूद असेल ते निर्लेखित करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठरावः-**सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री.शेख अन्सार इलाहीबक्ष इनामदार,प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ४३०, नळ कनेक्शनची पाणीपटटी आकरणी झालेली असून ऑफिस रिपोर्ट नुसार पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. सुनिता कांबळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४

विषय क्रमांक- ५० मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यांत येते की, महानगरपालिकेकडील अधिकारी / पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी भाडयाने वाहने लावणेकामी दि.२२/७/२०१४ रोजी ई- निविदा वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस २१ दिवसांची मुदत देण्यांत आली होती. परंतु प्रतिसाद न मिळाल्याने फेर ई निविदा दि.२०/८/२०१४ रोजी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येवून निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतू याही निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने सविस्तर रिपोर्ट लिहून वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिध्द करणेस मंजूरी घेण्यांत येवून दि.१२/११/२०१४ रोजी दैनिक गावकरी या वृत्तपत्रामध्ये निविदस प्रसिध्दी देण्यांत आली होती. सदर निविदेमध्ये दरपत्रके मागविणेत आली असून १५ दिवसांची मुदत देण्यांत आलेली होती.

सदर प्रसिध्दी दिलेल्या निविदेनुसार एकुण तीन निविदे प्राप्त झालेली आहेत. प्राप्त निविदा पुढील प्रमाणे १. साईनाथ ट्रॅव्हल्स ,२. शंभू ट्रॅव्हल्स, ३. सरकार ट्रॅव्हल्स निविदेनुसार सदरची दरपत्रके उघडणेकामी सविस्तर रिपोर्ट लिहून त्यास मान्यता घेण्यात येवून मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात समक्ष दि.३०/०३/२०१५ रोजी उघडणेत आले. सदर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता करण्यांत आला असून सोबत जोडलला आहे. तुलनात्मक तक्त्यानुसार इंधनासह व इंधनाव्यतिरिक्तचे दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकांमधील वाहन भाडयाचे दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकांमधील वाहन भाडयाने दर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण समितीच्या दरांपेक्षा देखील कमीचे आहेत.

उपरोक्त प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता केला असता शंभू ट्रॅव्हल्स यांचे वाहन भाडयाचे दर तुलनात्मक दृष्टया कमीचे असून कमीचे दरपत्रक मा.स्थायी समितीकडे मंजुरी करीता पाठविणेस मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे मोटर व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मा. मॅके. इंजि. यांचा अभिप्राय की, निविदा दरपत्रकात खाडाखोड आहे. खुलासा करावा.

यावर मोटर व्हेईकल क्लार्क यांचा अभिप्राय की, फेरसादर विनंती खुलासा देण्यात येतो की, शंभू टॅव्हल्स व सरकार ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेल्या दरपत्रकामध्ये झालेल्या खाडाखोडी साठी मोटर व्हेईकल जा.नं.२८ दि.५/५/२०१५ अन्वये लेखी खुलासा मागविण्यांत आला असता त्यांनी दरपत्रकामध्ये झालेल्या गिरवागिरवी (खाडाखोड) ही त्यांच्याच हातुन झालेली असल्याबाबत त्यांनी मान्य केलेले आहे. अशाबाबत लेखी खुलासा देवून कळविलेले आहे. तरी मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मेंके. इंजि. यांचा अभिप्राय की, प्राप्त दर अवाजवी वाटत असल्याने, कमीच्या निविदाधारकाची दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटी करणे योग्य मान्यतेस्तव या आदेशार्थ सादर./अ

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मॅकेनिकल इंजिनिअर यांचे शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणे योग्य राहील.

यावर मा.उपायुक्त (कर)साहेब यांचा अभिप्राय की, वाटाघाटी समक्ष बोलावून दि.१६/५/२०१५ सकाळी ११.०० वा

००००

मा. फेरसादर,

अहमदनगर महानगरपालिकेस अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडे पध्दतीने वाहने पुरविणेकामी प्राप्त दर पत्रकानुसार शंभु ट्रॅव्हल्स यांचे दर कमीचे असल्याने मा. मॅकेनिकल इंजिनिअर यांनी दराबाबत वाटाघाटी करणे योग्य असे मत दिले असता मा.उपायुक्त(कर) यांनी त्यास मान्यता देवून दरासंबंधी वाटाघाटी करणेकामी दि.१६/५/२०१५ रोजी यांच्या दालनात समक्ष बोलावून वाटाघाटी संबंधी शंभू ट्रॅव्हल्स एजन्सी यांना वाटाघाटी बाबतचे पत्र देण्यास तोंडी आदेश दिले असता दि.२०/५/२०१५ रोजी शंभु ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटी बाबतचे लेखी पत्र दिलेले आहे.

| अ.नं. | वाहन | सध्याचे दर | दैनंदिन कमी दर | प्रसावीत दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाटा सुमो | ६४०/- | २०/- | ६२०/- | सदरचे कमी केलेले दर हे इंधनाव्यतिरिक्त चे दिलेले आहेत व ॲव्हरेज दरपत्रकाप्रमाणे राहील. |
| २ | टाटा इंडिया | ६८०/- | ३०/- | ६५०/- | |
| ३ | मारूती व्हॅन | ६८०/- | ६०/- | ६२०/- | |
| ४ | स्कार्पिओ | ७००/- | २०/- | ६८०/- | |
| ५ | इंडिगो | ६८०/- | ४०/- | ६४०/- | |
| ६ | बोलेरो | ६४०/- | २०/- | ६२०/- | |
| ७ | रिक्षा | ६००/- | ५०/- | ५५०/- | |

तरी उपरोक्त तक्त्यानुसार वाटाघाटीनुसार कमीचे दर सादर केलेले असुन दरचे दरपत्रक मंजुरीकरिता मा.स्थायी समितीकडे पाठविणेस सविनय सादर./अ

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा फेरसादर असे.

यावर मॅके.इंजिनिअर यांचा अभिप्राय की, वाटाघाटीनंतरचे दराबाबत पुढील योग्य त्या आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मोटर व्हेई्कल व मॅके. इंजिनिअर यांचा शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतनुसार शंभू ट्रॅव्हल्स यांचे दर वाटाघाटी अंती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील मंजूर दरापेक्षा कमी दराचे असलेने मान्य करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

०००

संदर्भ :- १. ई निविदा क्र.७२२

२. मो.व्हे. दि.१०/०४/२०१५ अन्वये मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव सादर.

३. नगरसचिव यांचे जा.क्र. ११९ दिनांक २८/०८/२०१५

४. मा.स्थायी समितीची दिनांक १४/१०/२०१५ रोजीची सभा

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपलिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी सन २०१५-२०१६ या सालाकरीता वाहने भाडयाने लावणेकामी सविस्तर रिपोर्ट लिहून त्यास प्रशासकीय मंजूरी घेवून संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये नगरसचिव कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता.

या अनुषंगाने नगरसचिव कार्यालयाकडून संदर्भिय पत्र क्र.३ इकडेस प्राप्त झाले असून सदर पत्रात प्रस्तावास ४५ दिवसापेक्षा कालावधी झालेला आहे व याबाबत मा.स्थायी समितीचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे कळविले आहे.

मात्र दि.१४/१०/२०१५ रोजीचे मा.स्थायी समितीचे बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार नगरसचिव कार्यालयाकडून प्रशासनास पाठविण्यात आलेले प्रस्ताव पुनश्च मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात यावेत. असे निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसार विषयांकित कामाचा प्रस्ताव पुनश्च मा.स्थायी समिती कडे पाठविणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा रिपोर्ट असे

यावर मॅके.इंजि. यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतनुसार मान्यतेस्तव हरकत नाही मे आदेशार्थ सादर.

यावर मॅके.इंजि. पा.पु.वि.प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर सदर बाबत मा. आयुक्त यांचेशी दिनांक २८/१०/२०१५ व ३/११/२०१५ रोजी चर्चा झाली चर्चेअंती वाहन वापराच्या धोरणाबाबत व दराबाबत फेर पडताळणी करणे बाबतचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले महानगरपालिकेच्या मोटर व्हेईकल विभागाने वाहन भाडयाने लावणेकामी इंधनासह तसेच इंधना व्यतिरिक्त या दोनही बाबीबाबत दर मागीवलेले आहेत. त्यानुसार मा.उपायुक्त (कर) यांनी दराबाबत वाटाघाटी करीत असतांना इंधना व्यतीरिक्त दराबाब वाटाघाटी करून त्यानुसार प्रस्ताव मान्य आहे.

फेर पडताळणी करीत असतांना असे लक्षात येते की, इंधनाव्यतिरिक्त दराने वाहने भाडयाने लावणे कामी महानगरपालिकेस वाहनांना इंधन पुरवठा करीत असतांना स्वतंत्र कर्मचारीची नेमणूकासह साठा ठेवणे, नोंदवही ठेवणे, देखरेस ठेवणे, वाटप केलेल्या डिझेल नुसार किती कि.मी.वापर झाला. इत्यादी कामे करावी लागतात सदर कामे करीत असतांना सध्याच्या उपलब्ध अपुरा कर्मचारी वर्गामुळे जिकरीचे जाते. त्यामुळे इंधनासह वाहन भाडयाने लावणे सोईस्कर असल्याचे वाटते. मा.उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडील दि.०५/०९/२०१४ चे दरपत्रकही इंधनासहचे आहे. करीता

१] वाहन भाडयाने लावणे कामी जरी इंधना व्यतिरिक्त व इंधनासह दर मागविले असतील तरी इंधनासह आलेले दर स्विकारणे बाबत मा.स्थायी समितीला शिफारस करणे उचित वाटते.

२] शिफारस करीत असतांना जे दर उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दरापेक्षा जास्तीचे आहेत. त्याऐवजी उप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दर स्विकारणेस शिफारस करणे उचित वाटते. मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १] यंत्र अभियंता यांचे फेर प्रस्तावावरून असे दिसून येते की, केवळ इंधनाव्यतिरिक्ताच्या दराबाबत छाननी समितीने लघुत्तम दर निविदा धारकानी दराबाबत वाटाघाटीकरून दराची शिफारस केलेली आहे.,२] उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील दिनांक ५/९/२०१४ चे इंधनासह दराचे तुलनाकरिता (इंडिका कार) चे दर हे लघुत्तम निविदा धारकाचे दर हे जास्त असल्याचे दिसुन येतात. सबब वाटाघाटी अंती किफायतशीर दर स्वीकृत करणे आवश्यक ठरते.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, दर मंगळवारी मा. उपायुक्त (सा.) यांचे निविदादर पत्रके वाटाघाटीसाठी ठेवून विभागाने संबंधीतांना व्यतिरिक्तबाबत करावी.

यावर मॅके.इंजि. यांचा अभिप्राय की, मंगळवार दिनांक १/१२/२०१५ रोजी झालेल्या मा.छाननी समितीच्या बैठकीत सदर विषय ठेवण्यात आला यावेळी याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.शभु ट्रॅव्हल्स अहमदनगर यांचे निविदेतील १२ तास इंधनासहचे जे दर उपप्रोदशिक परिवहन प्राधिकरण यांचे दरापेक्षा कमीचे आहेत ते स्विकारणेस तसेच जे दर उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दराने करणेस मान्यता दिलेली आहे तसेच वाहनाचा वापर १२० कि.मी. पेक्षा जास्त झाल्यास व त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी असल्यास

असे जास्तीच्या किमीची आकारणी उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दराप्रमाणे देण्यात यावी.[सोबत छाननी समिती निर्णय] करीता मा.छाननी समितीच्या शिफारशीनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मा. फेरसादर आपल्या आदेशानुसार इंधनासह सर्व नमूद वाहनांचे दर व छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यतेस हरकत नाही मे. आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

००००

अहमदनगर महानगरपलिकेच्या मा. अधिकारी व पदाधिकारी यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी सविस्तर ऑफिस रिपोर्ट देवून महानगरपालिकेच्या वेबसाईट निविदा प्रसिध्द करण्यास मंजूरी घेण्यात येवून  दि.२२/०७/२०१४ रोजी दि.२३/७/२०१४ ते २०/८/२०१४ अखेर २१ दिवसाची मुदत देवून ई निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर वेळी एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती. त्यामुळे सदर निविदेस मुदत वाढीबाबतचे शुध्दीपत्रक क्र.१ ई निविदा क्र.७२२ , दि.२२/८/२०१४ रोजी प्रसिध्दीस निविदा मागविली असता सदर वेळी सुध्दा सदर विषयांकित कामाची एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती.

वाहने भाडयाने लावेणची आवकश्यता विचारात घेवून मा.आयुक्त यांचे दि.२७/१०/२०१४ रोजीचे प्रशासकीय मंजूरीने दि.१३/११/२०१४ रोजीच्या गावकरी या दैनिकात १५ दिवसाची मुदत देवून नोंदणीकृत प्रवासी वाहतूक संस्था यांच्याकडून वाहन भाडयाबाबतचे इंधनासह व इंधनाव्यतिरिक्तचे बंद पेटीद्वारे द्वी लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा दर मागविले असता वेळेत व मुदतीत खालीलप्रमाणे ३ निविदा प्राप्त झाल्या

१. शंभु ट्र्व्हल्स -- सारसनगर , अहमदनगर
२. साई लाभ -- अहमदनगर
३. सरकार ट्र्व्हल्स -- माळीवाडा, अहमदनगर

वरील निविदांची दरपत्रके उघडणेकामी सविस्तर ऑफिस रिपोर्ट लिहून त्यास मा.उपायुक्त [कर] यांची मंजूरी घेवून ती मा. उपायुक्त [कर] यांचे दालनात समक्ष उघडण्यात आली. सदर दरपत्रकांचा दराचा तुलनात्मक तक्ता केला असता तुलनात्मक दृष्टया शुभ ट्र्व्हल्स यांचे दर कमीचे आहेत.

निविदा दराचा तुलनात्मक तक्ता मंगळवार दिनांक ०१/१२/२०१५ रोजीचे निविदा छाननी समितीच्या बैठकीत सदरचा विषय ठेवण्यात आला असता शंभु ट्र्व्हल्स अहमदनगर यांचे निविदेतील १२ तास इंधनासहचे जे दर उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दरापेक्षा कमीचे आहेत. ते स्विकारणेस तसेच जे दर उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दराने करणेस मान्यता दिलेली  आहे. तसेच वाहनाचा वापर १२० किमी पेक्षा जास्त आल्यास व त्यास सक्षम प्राधिकारणाची मंजूरी असल्यास असे जास्तीच्या कि.मी.ची आकारणी उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दराप्रमाणे देण्यात  यावी.अशी मा.प्रशासकीय छाननी समितीने शिफारस केलेली आहे.

शुभु टॅव्हल्स यांचे निविदा दर व उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दर मधील तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | शंभू ट्र्व्हल्स | | | | | उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडील दर ५/९/२०१४ इंधनासह | | मा.छाननी समितीने शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इंधनाव्यतिरिक्त दर | | इंधनासह दर | | ॲव्हरेज | | | इंधनासह १२ तासाकरिता |
| | | २४ तासा करीता | २४ तासा करीता | २४ तासा करीता | १२ तासा करीता | | २४ तासा /२४० किमी | २४ तासा /१२० किमी | २५५ |
| १ | सुमो | ६४० | ६४० | ९५५ | ९५५ | १० | २४०० | १२०० | ९५५ |
| २ | स्कार्पिओ | ७०० | ७०० | १००० | १००० | १० | -- | -- | १००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बोलेरो | ६४० | ६४० | ९५५ | ९५५ | १० | २४०० | १२०० | ९५५ |
| ४ | व्हॅन | ६८० | ६८० | ११६० | ११६० | १० | -- | -- | -- |
| ५ | इंडिका | ६८० | ६८० | ९४५ | ९४५ | १५ | १६८० | ८४० | ८४० |
| ६ | इंडिगो | ६८० | ६८० | ९४५ | ९४५ | १५ | २१६० | १०८० | ९४५ |
| ७ | रिक्षा | ६०० | ६०० | ८०० | ८०० | २५ | ७०० [२४ तास /१०० कमी ] | ३५०[१२ तास /५० कमी ] | ३५०[१२ तास /५० कमी ] |

अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.उपायुक्त [कर], मा.आयुक्त साहेब यांनी प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यांस प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सविनय सादर.

येणेप्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा रिपोर्ट असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- कोण अधिकारी व पदाधिकारी आहेत

मेकॅ.इंजी.श्री.निकम :- महामनगरपालिकेकडे सध्या मोटार व्हेईकल मार्फत नगररचनाकार ,वैद्यकीय आरोग्य अधिकारी (MOH),सर्व प्रभाग अधिकारी ,विद्युत विभाग यांना भाडयाचे वाहन पुरविले जाते

मा.श्री.दिप चव्हाण :- सन २०१३ मध्ये गर्वरमेंट ऑडिअर ने रिकव्हरी काढली आहे अधिकारी व पदाधिकारी यांना वाहाने देवू नये असा ऑडिट पॅरा काढला आहे त्यांचेवर रिकव्हरी आहे सन २०१४-१५ चा कायदाच आहे

मेकॅ.इंजी.श्री.निकम :- वाहन प्रतिपुर्ती हा विषय वेगळा आहे. ऑडीट ऑब्जेक्शन ची पुर्तता केली असून महासभेत ठराव होवून ऑब्जेंक्शन क्लीअर केले आहे. वाहन प्रतीपुर्ती देता येईल.पदाधीका-यांमध्ये ,उपमहापौर ,स्थायी समिती सभापती व अधिका-यांमध्ये नगररचनाकार,आरोग्यधिकारी उपआरोग्यधिकारी ,इले.सुपरवायझर , वॉर्ड ऑफिसर, विसपुते साहेब यांचा समावेश आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- विसपुते साहेबांकडे फिल्डवर्क चे काम नाही,ज्यांचे कडे फिल्डवर्क चे काम नाही त्यांना वाहने देउ नका अलाडन्स द्या.

मा.उपायुक्त (सा):- ज्या पदांना आवश्यक नाही ते पहावे ,ज्यांना महासभेने मंजुरी दिली त्यांना प्रतिपुर्तीच अथवा वाहने द्यावीत.ही जी वाहने भाडयाने लावणार ती कीती लोकांना देणार.

मेकॅ.इंजी.श्री.निकम :- हे आज मी सांगू शकत नाही .ज्यांचे प्रस्ताव येतील त्याला त्यास मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी घेवून कार्यवाही करण्यात येईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- दोन्ही जीआर समोर ठेवा. ठराव झाला याचा अर्थ दयायलाच पाहिजे असे नाही.कामाची निकड पहा,काटकसर करा.

मा.उपायुक्त (सा ):- सुरूवातीपासून ज्यांना देतो त्यांनाच प्रस्तावित केले आहे.

मा.सौ.सुनिता कांबळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी सर्वानुमते हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणेकामी निविदांची दरपत्रकांचा दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार शंभू ट्रॅव्हल्स यांचे दर सर्वात कमी आहेत. मा.प्रशासकीय छाननी समितीने शिफारस केल्यानुसार ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. सुनिता कांबळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ५१ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदी डॉ.अमोल सुरेश जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती की, मा.प्र.मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे. दवा . व सुतिका गृह ६९१ दि.२१/१०/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "जा.क्र. आस्थापना नेमणूक १२८० दि.३०/०५/२०१५ अन्वये डॉ.श्री.अमोल जाधव यांची वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने सहा महिन्यांकरीता नेमणुक करण्यात आलेली होती.सदरच्या नेमणुकीचा कालावधी दि.२९/११/२०१५रोजी संपत आहे.सदरच्याकालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे.त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक१/१२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवाखाना यापदावर पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे."असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह जा.क्र. ९२५ दिनांक ०३/०३/२०१५ व कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह जा. क्र. २४ दिनांक १०/०४/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करिता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक ०९/०५/२०१५ रोजीच्या दैनिक पुढारी व दैनिक सार्वमत यावर्तमान पत्रामध्ये जहिराती प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार मुलाखती दि. २२/०५/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार मा.अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन पात्र ठरवुन निवड केलेली होती.त्यानुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करिता जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १२८० दि. ३०/०५/२०१५ अन्वये डॉ. अमोल सुरेश जाधव यांची दरमहा रु २०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती ही कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे करण्यात आलेली आहे.सदर वरील संबधीतांची सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील नेमणुकीची मुदत ही २९/११/२०१५ रोजी समाप्त होणार आहे.अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता स्त्रीरोग तज्ञ असे पदनाम मंजुर नाही.अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही. सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महनगरपलिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता आस्थापना कायम सुचिवरील स्त्रीरोग तज्ञ ही पदे मंजुर नाहीत. त्यामुळे नागरिकांना आपातकालीन परिस्थितीमध्ये तातडीने महत्वाच्या आरोग्य सेवे विषयी सेवा उपलब्ध करुन देणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. मा.प्र.मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा. दे.दवा.त्यांचे कडील जा.क्र.कै. बा.दे.दवा.व सुतिका गृह ६९१

दि. २१/१०/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी डॉ. अमोल सुरेश जाधव यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.०१/१२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रु.२०,०००/-या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा. दे.दवा.त्यांचे कडील जा.क्र.कै. बा.दे.दवा.व सुतिका गृह ६९१ दि. २१/१०/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी डॉ. अमोल सुरेश जाधव यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.१/१२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारानुसार रु. २०,०००/ या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख व प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदी डॉ.अमोल सुरेश जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.संपत बारस्कर :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीची असल्याने विषय मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदी डॉ.अमोल सुरेश जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजूरीस हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ५२ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : रक्तपेढी विभाग जा.क्र. २०४ दिनांक २०/११/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, रक्तपेढी विभाग जा.क्र.२०४ दिनांक २०/११/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन अ.क्र. १ ते अ.क्र. ५ यांचा कालावधी दि.१५/७/२०१५ते १४/०१/२०१६ व अ.क्र. ६ यांचा कालावधी २९/८/२०१५ ते २८/२/२०१६ अखेर आहे सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची पुढील सहा महिन्या करीता नेमणूक करण्यास प्रस्ताव सविनय सादर." असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

| अ.क्र. | नांव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री.संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | १५/७/२०१५ ते १४/०१/२०१६ |
| २ | श्री.शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १५/७/२०१५ ते १४/०१/२०१६ |
| ३ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | परिचारिका | १५/७/२०१५ ते १४/०१/२०१६ |
| ४ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | परिचारीका | १५/७/२०१५ ते १४/०१/२०१६ |
| ५ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | परिचारिका | १५/७/२०१५ ते १४/०१/२०१६ |
| ६ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | २९/८/२०१५ ते २८/०२/२०१६ |

यापुर्वी रक्तपेढी विभाग जा.क्र. १८ दिनांक ११ / ५ / २०१५ व जा.क्र. ७७ दिनांक ९/७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार संबधीत यांची तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी अटी व शर्ती प्रमाणे अनु.क्र. १ ते ५ यांची जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक २४४८ दिनांक १३/०७/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १५/०७/२०१५ पासुन सहा महिन्या करीता व अनु.क्र. ६ यांची जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ३८२९ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २९/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदर केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे इकडील जा. क्र. आस्था. वर्कशिट ५४ दिनांक १५ / ७ / २०१५ व जा. क्र. आस्था. वर्कशिट ११५ दिनांक १९ / ९ / २०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ व २२ दिनांक १४ / १० / २०१५ अन्वये ठराव पारीत करुन सदर संबधितांच्या केलेल्या मानधनावरील केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवे करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन ,स्टाफ नर्स या पदी अटी व शर्ती प्रमाणे

मानधनावर संबधीतांची करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | कार्यरत विभाग | कार्यरत वर्ष | सद्यस्थितीमधील तांत्रिक खंड देवुन जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८ ११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | १०,०००/- |
| २ | श्री.शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८ ११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | १३,०००/- |
| ३ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | परिचारिका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८ ११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |
| ४ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | परिचारीका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८ ११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |
| ५ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | परिचारिका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८ ११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |
| ६ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | रक्तपेढी | दि.२७/४/१० पासुन | ३८२९ १४/९/१५ | २९/८/१५ ते २८/२/१६ | १३,०००/- |

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही वरील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या दिनांका पासुन समाप्त होत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागा करीता मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मेडीकल ऑफिसर | १ | १ | ------- |
| २ | लॅब टेक्निशियन | ४ | ४ | ------- |
| ३ | जन संपर्क अधिकारी | मंजुर नाही | ------ | ------- |
| ४ | परिचारिका | ४ | ३ | १ |
| | एकुण | ९ | ८ | १ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मध्ये **५३-नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे.(सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये जनसंपर्क अधिकारी असे पदनाम आस्थापना कायम सुचीवर मंजुर नाही , तसेच लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स ही पदे आस्थापना कायम सुचीवर अत्यंत कमी प्रमाणात मंजुर असल्यामुळे नागरीकांना आपातकालीन

परिस्थितीमध्ये वेळेवर तातडीने रक्त पुरवठा देणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग २०४ दिनांक २०/११/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी संबधीतांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग २०४ दिनांक २०/११/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी खालील तक्त्यात दर्शविल्यांची त्यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | १०,०००/- | रक्तपेढी विभाग |
| २ | श्री.शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १३,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ३ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ४ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ५ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ६ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १३,०००/- | रक्तपेढी विभाग |

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणे बाबत मंजुरीसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सोबत : सदर करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्दसाठी पुर्ननियुक्ती आदेशा बाबतचा प्रारूप मसुदा

सन २०१५-२०१६

अंदाज पत्रकीय तरतुद

लेखाशिर्ष - मानधन (ऑननरी डॉक्टर)

एकुण तरतुद रु . ७०,००,०००/-

झालेला खर्च रु. ४६,६९,९२४/-

( माहे ऑक्टोबर पेड इन नोव्हेंबर २०१५ पर्यत)

---------------------------------

शिल्लक तरतुद - २३,३०,०७६/-

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर मा. प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.मु.ले.अ. यांचा अभिप्राय की, * मनपा अधिनियम १९४९ (५३)प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल., * मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करावे.

यावर मा.मु.ले.प. यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र मनपा अधि. (सुधरित) २०११ चे कलम ५३ (३) प्रमाणे रिक्त पदाचे अनुषंगाने कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, रक्तपेढी करिता मानधनावरील सहा पदांना तांत्रिक खंड देवून पुनर्नियुक्ती करिता मुलेप यांचे अभिप्रायानुसार प्रकरण मे.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पाठवणे योग्य,

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.संपत बारस्कर :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीची असल्याने विषय मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स यापदी ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे तांत्रीक खंड देवून कर्मचारी अनुक्रमांक १ ते ५ यांना दि.१७/१/२०१६ पासून व अनुक्रमांक ६ यांना दिनांक २/३/२०१६ पासून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ५३ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ.श्री.प्रविण व्ही.कराळे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबतऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की ,मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ६६८ दि. १२/१०/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६ दि.१६/१२/२०१४ अन्वये अ.नगर मनपा मधिल कै.बा. दे. दवाखाना व सुतीका गृह येथे रुग्णांच्या दैनंदिन ऑपरेशन कामी शहरातील १२ भुलतज्ञांना तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ म्हणुन प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रुपये ५००/- , प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रु १०००/- व नाईट ॲण्ड हायरिक्स केसेस करीता रु१५००/-यावर दि. ६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७अखेर तीन वर्षा करिता पॅनलशिपवर करारबध्द करण्यातआलेलेआहे.तद्नंतर डॉ.श्री.प्रविण.व्ही.कराळे (M.D.Anaesthesia and Critical care) यांनी भुलतज्ञ म्हणुन कॉल बेसीसवर काम करण्यास तयार असले बाबत दि. ०८/१०/२०१५ रोजी कै.बा.दे. दवाखाना येथे विनंती अर्ज केलेला आहे.तरी डॉ.प्रविण व्ही कराळे, भुलतज्ञ यांच्या विनंती अर्जा नुसार त्यांना स्थायी समिती ठराव क्र. १२६ दि. १६/१२/२०१४ नुसार कराराच्या अटी व शर्तीवर सध्या भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणे उचित वाटते . " असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ३०१ दिनांक ०५/०७/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा. दवा अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञांची पॅनलशिपवर व्हिजीट बेसीसवर दि. ०६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर तीन वर्षा करिता करारबध्द नियुक्ती बाबत सुचित करण्यात आलेले होते.त्यानुषंगाने सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था.वर्कशिट १६७ दि. १०/९/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेले होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दि.१६/१२/२०१४ अन्वये ठराव पारित करुन मान्यता दिल्यानुसार जा.क्र.आस्था. ८१३१ दि. २४/२/२०१५ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ डॉक्टर म्हणुन डॉ.सायंबर व इतर ११ यांची अटी व शर्तीनुसार प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रुपये ५००/- प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रु. १०००/- व नाईट ॲण्ड हायरिक्स केसेस करीता रु१५००/- यावर दि ६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर तीन वर्षा करिता पॅनलशिपवर व्हिजीट बेसीसवर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे संदर्भिय जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ६६८ दिनांक १२/१०/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवा. अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ यापदी पॅनलशिपवर डॉ.श्री.प्रविण व्ही कराळे यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दि. १६/१२/२०१४ अन्वये पारित ठराव करुन मान्यता दिल्याच्या अनुषंगाने त्यानुसार सदर इतर कालावधी करिता

दर्शविलेल्या व्हिजीट बेसीसवर मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणे बाबत निर्णय झाल्यास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेवुन अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबत कार्यवाही करणे उचित होईल.त्यामुळे सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरी करिता निर्णयासाठी पाठविणे संयुक्तीक होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यतेस्तव

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६ दि. १६/१२/२०१४ चे ठरावाप्रमाणे नियुक्त केलेल्या भुलतज्ञांच्या पॅनल शिपमध्ये व्हिजीट बेसीसवर श्री.कराळे ,भुलतज्ञ यांना समाविष्ठ करणेबाबतच्या निर्णयाकरीता मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ.श्री.प्रविण व्ही.कराळे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबतऑफिस रिपोर्ट .

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.संपत बारस्कर :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- विषय क्र.५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५१ ते ५३ हे पुर्ननियुक्तीची असल्याने विषय मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ.श्री.प्रविण व्ही.कराळे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ५४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, परिचारिका यापदी अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) संतोष भाऊसाहेब काळे, यांचा दिनांक २१/१०/२०१५ रोजीचा अर्ज.

२) अनिता रमेश तोडमल, सुलभा प्रकाश पवळ,शिल्पा प्रभाकर गायकवाड यांचा दिनांक ३१/१०/२०१५ रोजीचा अर्ज.

३) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभागृह नेता यांचे दिनांक २१/१०/२०१५ रोजीचे पत्र.

४) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभागृह नेता, यांचे दिनांक ३१/१०/२०१५ रोजीचे शिफारस पत्र.

सादर,

विनंती की,श्री.संतोष भाऊसाहेब काळे यांनी संदर्भिय क्र. १ नुसार दि.२१/१०/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये दरमहा मानधन रु.१०,०००/-हे कमी असल्याने त्यामध्ये वाढ करुन दरमहा रुपये १६,०००/- इतके करण्यात यावी असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

तसेच मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभागृह नेता यांनी दि.२१/१०/२०१५ रोजी पत्र देवुन त्यामध्ये रक्तपेढीतील सदरील कामाचे स्वरुप पहाता व सध्याची महागाई पहाता त्यानुसार मिळणारे मानधन खुपच कमी आहे. सदरचा विषय मा.स्थायी समितीपुढे घेण्यात यावा असे सुचित केलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. २ नुसार अनिता रमेश तोडमल, सुलभा प्रकाश पवळ, शिल्पा प्रभाकर गायकवाड यांनी दि.३१/१०/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये दरमहा मानधन रु.७,०००/- हे कमी असल्याने त्यामध्ये वाढ करुन दरमहा रुपये १५,०००/- इतके करण्यात यावी असे नमुद करुन विनंती केलेली आहे. सदर अर्जासोबत मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभागृह नेता, यांचे दि. ३१/१०/२०१५ रोजीचे शिफारस पत्र जोडलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवे करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , परिचारिका या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर संबधीतांची करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | कार्यरत विभाग | कार्यरत वर्ष | सद्यस्थितीमधील तांत्रिक खंड देवुन जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८/११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | १०,०००/- |
| २ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | परिचारिका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८/११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |
| ३ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | परिचारीका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८/११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |
| ४ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | परिचारिका | रक्तपेढी | दि. १/१०/१२ पासुन | २४४८/११/७/१५ | १५/७/१५ ते १४/१/१६ | ८,०००/- |

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही वरील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या दिनांका पासुन समाप्त होत आहे.

संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागा करिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदी मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता मानधन वाढी संदर्भा बाबतचा तपशिल खालील प्रमाणे...

| अ. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | सध्याचे अदा करण्यात येणारे दरमहा मानधन रु | अर्जामध्ये मागणी केलेली दरमहा मानधन वाढ रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १ | जन संपर्क अधिकारी | रक्तपेढी | १०,०००/- | १६,०००/- |
| २ | परिचारीका | रक्तपेढी | ८,०००/- | १५,०००/- |

संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागा करिता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी, परिचारीका यापदी दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणे बाबतचा विषय हा दरमहा होणारा आर्थिक खर्च व धोरणात्मक स्वरुपाचा बाब असुन सदरचा विषय हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठवावा लागेल.

तरी संदर्भिय अर्ज व मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभागृह नेता यांचे दिनांक २१/१०/२०१५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी, परिचारीका यापदी अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणे बाबतचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीसाठी मा.मुख्य लेखा अधिकारी, मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवून आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर मा. प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.मु.ले.अ. यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मु.ले.प. यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यास हकरत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा). यांचा रजेवर

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, परिचारिका यापदी अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.सभापती साहेब :- मानधनात किती वाढ करावयाची आहे.

आस्थापना प्रमख श्री साबळे :- सध्याचे मानधन हे १०,०००/- असून श्री.संतोष भाउसाहेब कांबळे,जनसंपर्क अधिकारी यांनी मानधन रूपये १६,०००/- करणे अर्ज केला आहे. तसेच परिचारीका अनिता रमेश तोडमल, सुलभा प्रकाश पवळ, शिल्पा प्रभाकर गायकवाड यांचे सध्याचे मानधन रक्कम रू.८०००/- असून त्यांनी रक्कम रू.१५०००/- दरमहा मानधन करणे बाबत अर्ज केला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- यांनी अर्ज केला परंतु यांचे काम समाधान कारक आहे का ?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- यांचे काम चांगले आहे.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती कडे श्री.शेख नईम युसुफ व श्रीमती मोरे पल्लवी दगडू ,लॅाब टेक्नीशियन यांनी मानधन वाढ करणे करीता अर्ज केला आहे.यांचे सध्याचे मानधन किती आहे.

आस्थापना प्रमख श्री साबळे :- यांचे सध्याचे मानधन हे १३०००/- आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- सरसकट सर्वाच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ३०००/- वाढ करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- तीन हजार रूपयाने सर्वाचे मानधन वाढवावे.

मा.श्री.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार व स्थायी समिती कडील प्राप्त अर्जानुसार जनसंपर्क अधिकारी , लॅाब टेक्नीशियन,परिचारिका पदांवरील अधिकारी व कर्मचा-यांच्या मानधनात रूपये ३०००/- वाढ करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष भाऊसाहेब काळे, परिचारिका अनिता रमेश तोडमल, सुलभा प्रकाश पवळ, शिल्पा प्रभाकर गायकवाड व लॅाब टेक्नीशियन श्री.शेख नईम युसुफ व श्रीमती मोरे पल्लवी दगडू , या पदांचे अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता सध्याचे दरमहा असलेल्या मानधना मध्ये रक्कम रूपये ३०००/- ने वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका